शुक्रवार, २४ सप्टेंबर २०२१
◆ वर्ष १४ ◆ अंक ६७
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ६ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## ओबीसी आरक्षणाच्या अध्यादेशावर राज्यपालांची स्वाक्षरी



**मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून चर्चेत असलेले ओबीसींसाठीचे राजकीय आरक्षण अखेर सत्यात उतरताना दिसू लागले आहे. यासंदर्भात राज्य सरकारने अध्यादेश काढण्याचा निर्णय घेतल्यानंतर तो राज्यपालांच्या मंजुरीसाठी पाठवण्यात आला होता, मात्र काही सूचनांसह तो अध्यादेश राज्यपालांनी पुन्हा पाठवला होता. यानंतर राज्य सरकारने त्यात आवश्यक ते बदल करून राज्यपालांकडे पाठवल्यानंतर गुरुवारी (दि.२३) राज्यपालांनी त्यावर स्वाक्षरी करून आपल्या मंजुरीची मोहोर उमटवली आहे. त्यामुळे आता राज्यात ओबीसी समाजाला राजकीय आरक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. दरम्यान, अध्यादेशावर स्वाक्षरी केल्याबद्दल अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी राज्यपाल भगतसिंह कोश्यारींचे आभार मानले आहेत.

### अंतरंग

पोलीस ठाण्यात विष पिऊन गेलेल्या तरुणाचा मृत्यू/२
खबरबात : महाविकास आघाडीत महानाराजी/४
रायगड प्रीमियर लीगसाठी खेळाडूंवर बोली/६

# महाराष्ट्र पुन्हा हादरला!

## डोंबिवलीत अल्पवयीन मुलीवर २९ जणांनी केला अत्याचार

**डोंबिवली : प्रतिनिधी**

अल्पवयीन मुलीचा अश्लील व्हिडीओ बनवून या व्हिडीओच्या आधारे या मुलीला ब्लॅकमेल करत तिच्यावर २९ जणांनी मागील नऊ महिन्यांपासून विविध ठिकाणी सामूहिक बलात्कार केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला असून याप्रकरणी तरुणीच्या तक्रारीवरून मानपाडा पोलिसांत गुन्हा दाखल करत पोलिसांनी आतापर्यंत दोन अल्पवयीन आरोपींसह २३ जणांना अटक केली आहे. उर्वरित सहा आरोपींचा शोध सुरू असल्याचे अप्पर पोलीस आयुक्त दत्तात्रेय कराळे यांनी सांगितले. या प्रकरणाचा तपास ठाणे सहाय्यक पोलीस आयुक्त सोनाली ढोले करत आहेत.

डोंबिवलीनजीक असलेल्या भोपर परिसरात राहणाऱ्या १४ वर्षीय मुलीची एका तरुणाशी ओळख होती या ओळखीतून त्यांच्यात जानेवारी २०२१मध्ये शारीरिक संबध निर्माण झाले, मात्र या तरुणाने या दरम्यान तरुणीचे अश्लील व्हिडीओ तयार करत या व्हिडीओच्या आधारे या तरुणीला ब्लॅकमेल करत आपल्या इतर मित्रांसमवेत या तरुणीवर वेळोवेळी अत्याचार केल्याचा या पीडित तरुणीचा आरोप आहे. मागील नऊ महिन्यांच्या कालावधीत तब्बल २९ जणांनी पीडितेला व्हिडीओच्या आधारे ब्लॅकमेल करत डोंबिवली, रबाळे, वडवली, बदलापूर या विविध ठिकाणी तिला नेत तिच्यावर सामूहिक बलात्कार केल्याचा आरोप पीडितेने केला आहे.



### अतिशय संतापजनक घटना : देवेंद्र फडणवीस

डोंबिवलीच्या भोपरमध्ये १४ वर्षीय अल्पवयीन मुलीवर २९ जणांनी सामूहिक बलात्कार केल्याची घटना ऐकून मन सुन्न झालं. ही अतिशय भयंकर आणि संतापजनक घटना आहे. महिला अत्याचाराची सातत्याने वाढणारी ही प्रकरणं चीड आणणारी आहेत. डोंबिवलीसारख्या भागात अशी घटना अतिशय गंभीर आहे. यातील आरोपींना कठोरातील कठोर शिक्षा झाली पाहिजे. आरोपींना जरब बसेल आणि अशा घटना पुन्हा घडणार नाहीत, यासाठी राज्य सरकारने आतातरी तातडीने आणि गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

दोन दिवसांपूर्वी यातील सात आरोपींनी पीडितेला वडवली येथे नेत तिच्यावर एकाच वेळी सामूहिक बलात्कार केल्यानंतर तिला प्रचंड वेदना होऊ लागल्याने तिने ही घटना आपल्या आईला सांगितली. त्यानंतर आईने याप्रकरणी मानपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेत ठाणे सहाय्यक पोलीस आयुक्त सोनाली ढोले यांच्या नेतृत्वाखाली अप्पर पोलीस आयुक्त दत्तात्रेय कराळे, पोलीस उपायुक्त संजय गुंजाळ, सहाय्यक पोलीस आयुक्त जे. डी. मोरे, मानपाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दादाहरी चौगुले आणि पथक याप्रकरणी अधिक तपास करत आहे.

दरम्यान, पीडितेला उपचारासाठी ठाणे सिव्हिल रुग्णालयात दाखल करण्यात आले असून तिची तब्येत स्थिर असल्याचे कराळे यांनी सांगितले.

### अत्याचार रोखण्यासाठी ॲट्रॉसिटीसारखा कायदा करा : चित्रा वाघ



महिलांवरील अत्याचाराच्या घटनांना पायबंद घालण्यासाठी अनुसूचित जाती-जमाती जातीय अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या (एससी, एसटी ॲट्रॉसिटी) धर्तीवर कायदा बनवा, अशी मागणी भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्ष चित्रा वाघ यांनी केली. या मागणीचे निवेदन गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांना देण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. चित्रा वाघ यांनी सांगितले की, महाआघाडी सरकार सत्तेवर आल्यापासून महिलांवर अत्याचार करणाऱ्या गुन्हेगारांना मोकळे रान मिळाले आहे. महिलांवरील वाढत्या अत्याचाराची चर्चा करण्यासाठी विधिमंडळाचे विशेष अधिवेशन बोलाविण्याची सूचना करणाऱ्या राज्यपालांना मुख्यमंत्र्यांनी दिलेले उत्तर अत्यंत धक्कादायक आहे. महाराष्ट्रातील महिलांवरील अत्याचाराच्या घटनांची अन्य राज्यातील घटनांशी तुलना करून मुख्यमंत्र्यांनी महिलांवरील अत्याचाराच्या घटनांबाबत आपण आणि आपले सरकार किती असंवेदनशील आहे, हेच दाखवून दिले आहे.

## एकात्म मानववादातून भाजपची सबका साथ, सबका विकास ही घोषणा : आमदार प्रशांत ठाकूर

### केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव, विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस उद्या पनवेलमध्ये

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

एकात्म मानववाद भारतात रुजवणारा नेता म्हणून पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची जनमानसात ओळख आहे. अखंड समाजाचा विचार करणाऱ्या पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या चिंतनावर विचार करण्याची देशाला गरज आहे, असे प्रतिपादन उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले. सेवा व समर्पण अभियान अंतर्गत पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंतीनिमित्त रायगड जिल्हा भाजपच्या वतीने शनिवारी (दि. २५) दुपारी १ वाजता पनवेलमध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले.

खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयाच्या प्रांगणात सेवा व समर्पण अभियानांतर्गत पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमाला केंद्रीय पर्यावरण व वने मंत्री भुपेंद्र यादव, तसेच महाराष्ट्र राज्य विधानसभेचे विरोधी पक्षनेते माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रदेश संघटन मंत्री श्रीकांत भारतीय, प्रदेश सरचिटणीस तथा रायगडचे माजी पालकमंत्री रवींद्र चव्हाण, सेवा समर्पण अभियानचे प्रदेश प्रमुख राज पुरोहित, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार रविशेठ पाटील, आमदार महेश बालदी, महापौर डॉ. कविता चौतमोल, युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष विक्रांत पाटील, भाजपचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष महेश मोहिते यांच्यासह जिल्ह्यातील पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.



या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते शासकीय योजनेतील लाभार्थींचा सन्मान, दिव्यांगांना मदत, कोरोनामुळे अनाथ झालेल्या विद्यार्थ्यांना मदत, तसेच कुष्ठरुग्णांना धान्यवाटप केले जाणार आहे. सध्या देशात सुरू असलेल्या मेक इन इंडिया, स्टार्टअप इंडिया, ग्रामीण कौशल्य योजना, मुद्रा बँक योजना आदी कल्याणकारी योजनांमागे मोदी सरकारचा नेमका सिद्धांत अंत्योदय, असाच आहे. त्यांचा आदर्श घेऊन भाजपच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'सेवा व समर्पण अभियान' अंतर्गत दिव्यांगांना कृत्रिम अवयव-उपकरणे वाटप, आरोग्य तपासणी शिबिर, गरीबवस्ती, अनाथाश्रम, वृद्धाश्रम व रुग्णालयांना भेट देऊन फळवाटप, प्लास्टिक निर्मूलन मोहीम, रक्तदान शिबिर, धान्यवाटप, कापडी पिशव्यांचे वाटप, नदी सफाई अभियान, अशाचप्रकारे विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जाणार आहेत. त्या अनुषंगाने पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला भाजप व सर्व आघाड्यांचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, शक्तीकेंद्र, बूथ अध्यक्ष, तसेच कार्यकर्त्यांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले आहे. (पान २ वर..)

### निवडक

#### पंजाबमध्ये तीन दहशतवाद्यांना अटक

**चंदीगढ :** पंजाब पोलिसांनी हत्यारे आणि स्फोटकांसहीत तीन दहशतवाद्यांना अटक केली आहे. हे तीनही दहशतवादी पंजाबच्या मोगा जिल्ह्याचे रहिवासी आहेत. कुलविंदर सिंह, कमलप्रीत सिंह आणि कंवरपाल सिंह अशी या तिघांची नावे आहेत. पंजाबच्या तरनतारण जिल्ह्यात घातपात घडवून आणण्याच्या प्रयत्नात असलेल्या या तीन दहशतवाद्यांना पंजाब पोलिसांच्या सतर्कतेमुळे अटक झाली.

#### पाकिस्तानला धक्का; 'सार्क'ची बैठक रद्द

**न्यूयॉर्क :** 'साउथ एशियन असोसिएशन फॉर रिजनल कोऑपरेशन'च्या (सार्क) परराष्ट्रमंत्र्यांची येत्या शनिवारी न्यूयॉर्क येथे होणारी बैठक रद्द करण्यात आली आहे. 'सार्क' देशांच्या बैठकीत तालिबानच्या तथाकथित सरकारच्या प्रतिनिधींनीही सहभागी व्हावे, अशी मागणी पाकिस्तानने केली होती. भारतासह इतर सदस्य देशांनी या मागणीस तीव्र विरोध नोंदविल्याने ही बैठक रद्द करण्यात आली.



## राष्ट्रवादीचे विशाल म्हात्रे सहकाऱ्यांसह भाजपत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**


उलवे नोडे येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला जोरदार धक्का बसला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उलवे नोड अध्यक्ष विशाल म्हात्रे यांनी आपल्या सहकाऱ्यांसह भारतीय जनता पक्षामध्ये गुरुवारी (दि. २३) जाहीर पक्षप्रवेश केला. सर्व प्रवेशकर्त्यांचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पक्षाची शाल घालून पक्षात स्वागत केले. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, भारतीय जनता पक्ष आणि आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांचे प्रश्न सोडविण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे तुमच्या सर्व समस्या सोडविण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करू, असे आश्वासन त्यांनी प्रवेशकर्त्यांना दिले.

भारतीय जनता पक्षाच्या सक्षम नेतृत्वावर विश्वास ठेऊन राष्ट्रवादी काँग्रेसचे उलवे नोड अध्यक्ष विशाल म्हात्रे, परेश मोकल, हसन मिया, रीयान लेवीस, नसरुद्दीन मुल्ला, महेश दिवाकर, अजहर शेख, मंगेश ठाकूर, जयवंत घरत, गौरव म्हात्रे, सरोज त्रिपाठी, मंगेश पाटील यांनी भारतीय जनता पक्षामध्ये जाहीर पक्षप्रवेश केला. या वेळी विशाल म्हात्रे यांची भारतीय जनता पार्टी उलवे नोड उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये झालेल्या या पक्षप्रवेश सोहळ्याला भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, भाजप नेते वैभव ठाकूर, नामदेव ठाकूर, अंकुश ठाकूर, नंदकुमार ठाकूर, प्रवीण ठाकूर, हरिदास घरत, युवा मोर्चा उलवे नोड अध्यक्ष निलेश खारकर आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## महाराष्ट्राचा कायदा देशापेक्षा वेगळा आहे का?

### राज ठाकरेंचा सवाल

**नाशिक : प्रतिनिधी**



राज्य सरकारने नवी प्रभाग रचना जाहीर केली असून त्यावर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी नाशिक येथे पत्रकारांशी बोलताना टीका केली.

अशी कोणतीही पद्धत देशात कुठेही अस्तित्वात नसताना महाराष्ट्रात हे कुठून आणि का सुरू झालं, याचं एकमेव कारण सत्ता काबीज करणं आहे, महाराष्ट्राचा कायदा देशापेक्षा वेगळा आहे का, असे राज ठाकरे या वेळी म्हणाले.



## काँग्रेस नेत्यांनी घेतली देवेंद्र फडणवीस यांची भेट

**मुंबई : प्रतिनिधी**

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी भाजपचे नेते आणि विधानसभेचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. राज्यसभेची पोटनिवडणूक बिनविरोध व्हावी या चर्चेसाठी काँग्रेसच्या नेत्यांनी ही भेट घेतली, परंतु या भेटीमुळे महाविकास आघाडीतील इतर दोन पक्ष नाराज झाल्याची माहिती आहे. महाविकास आघाडीच्या एकीवर काँग्रेसला विश्वास नाही का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. काँग्रेस नेत्यांनी फडणवीस यांची भेट घेतल्याने शिवसेना, राष्ट्रवादीला हे रुचले नाही.





पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
शुक्रवार, दि. २४ सप्टेंबर २०२१ रोजी होणारे
कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)
कोव्हॅक्सिन
सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

१. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
२. यूपीएचसी-२, कोळेश्वर शाळा, कोळीवाडा, पनवेल
३. यूपीएचसी-३, बांठिया स्कूलजवळ, नवीन पनवेल
४. यूपीएचसी-४, गुरुद्वारासमोर, कळंबोली
५. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
६. रामशेठ ठाकूर शाळा, कामोठे
७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
८. पनवेल जिमखाना, ५२ बंगला, पनवेल

ग्रामीण लसीकरण होणार नाही याची नोंद घ्यावी.


### रायगडात पुन्हा 'मोरया मोरया'



पनवेल : भाद्रपद कृ. चतुर्थीला रायगड जिल्ह्यात दीड दिवसाच्या गणपतीचे आगमन होते. त्यालाच गौरा गणपती किंवा साखरचौथचा गणपती म्हणतात. आज येणाऱ्या गौरा गणपतीच्या तयारीचे दृश्य टिपले आहे छायाचित्रकार लक्ष्मण ठाकूर यांनी.

## अनंत गीतेंनी मांडलेला मुद्दा वास्तववादी : नारायण राणे

**मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेनेचे माजी खासदार अनंत गीते यांनी केलेल्या वक्तव्यामुळे सध्या राजकीय नेत्यांकडून वेगवेगळ्या प्रतिक्रिया उमटत आहेत. एकीकडे शिवसेनेने गीते यांच्या वक्तव्यापासून फारकत घेतली असून दुसरीकडे राष्ट्रवादीने त्यांच्यावर टीका केली आहे. दरम्यान, भाजप नेते आणि केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी अनंत गीतेंनी मांडलेला मुद्दा वास्तववादी चित्र आहे, असे सांगत त्यांची बाजू घेतली आहे. एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी यावर प्रतिक्रिया दिली.



गीतेंनी मांडलेला मुद्दा वास्तववादी चित्र आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादीची तडजोड पदांसाठीच झाली आहे. शिवसेनेने तर मुख्यमंत्रीपदासाठी हिंदुत्वाला मूठमाती दिली. त्यामुळे शिवसेनेला हिंदुत्वावर बोलण्याचा अधिकार नाही. गीतेंनी सांगितले ते १०० टक्के खरे आहे, असे ना. राणे म्हणाले. दरम्यान, अनंत गीतेंची जी अवस्था आहे तीच शिवसैनिकांची आहे. कोणीच त्यांना विचारत नाही. अनंत गीतेंचे चुकतेय कुठे, अशी विचारणाही त्यांनी केली.

# राज्यातील महिला सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

## ■ डोंबिवलीतील घटनेवरून देवेंद्र फडणवीसांची ठाकरे सरकारवर टीका



**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात एखादी घटना घडली की, अन्य राज्यांकडे बोट दाखविणे किंवा विपरित प्रतिक्रिया देणे, ही पूर्णपणे असंवेदनशीलता आहे. डोंबिवलीतील आजची घटनेमुळे तर महिला सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे, असे माजी मुख्यमंत्री आणि विधानसभेतील विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी (दि. २३) नागपूर येथे पत्रकारांशी बोलताना सांगितले.

ते म्हणाले की, महाराष्ट्रात महिला अत्याचाराच्या वाढत्या घटना या चिंताजनक आहेत. डोंबिवली हा तसा शांत भाग मानला जातो, त्यामुळे तेथे अशी घटना ही खरोखर चिंता वाढविणारी आहे. दुर्दैवी भाग म्हणजे अशा घटना घडल्यानंतर इतर राज्यांकडे बोट दाखविणे किंवा त्याची दखलही न घेणे ही असंवेदनशीलता आहे. मुळात महिला आमदारांनी राज्यपालांकडे शक्ती कायद्यासंदर्भात विशेष अधिवेशन बोलाविण्याची मागणी केली होती. ते निवेदन राज्यपालांनी राज्य सरकारकडे पाठविले. वस्तुत: त्यांना आदेश देण्याचा पूर्ण अधिकार असतानाही त्यांनी आदेश दिलेले नव्हते, तर सूचना केली होती. राज्यपालांची सूचना चुकीची आहे का? मात्र राज्यपालांच्या त्या सूजनावजा निवेदनावर अशा पद्धतीने उत्तर देणे, ही पूर्णत: अपरिपक्वता आहे. राज्यपालांकडे अनेक प्रकारचे शिष्टमंडळ भेटीला येत असतात. त्यावर अभिप्राय देऊन ते राज्य सरकारकडे पाठवितात. ही पद्धत वर्षानुवर्षे चालत आली आहे. आमचे सरकार असताना सुद्धा काँग्रेस-राष्ट्रवादीचे नेते तत्कालिन राज्यपालांना भेटत आणि तेही निवेदन आमच्याकडे येत असत. त्यामुळे राज्यपालांच्या पत्रांना उत्तरे देण्यात श्रम घालविण्यापेक्षा महिलांवरील वाढते अत्याचार कसे थांबविता येतील, यावर श्रम घालविले, तर ते अधिक हिताचे ठरेल, असेही फडणवीस यांनी म्हटले आहे.

ओबीसी आरक्षणाच्या अध्यादेशासंदर्भात विधी व न्याय विभागाचे अभिप्राय ओव्हररूल न करता फाईल राज्यपालांकडे पाठविण्यात आली होती. त्यामुळे त्यावर तशीच स्वाक्षरी झाली असती, तर तो अध्यादेश खारीज झाला असता. त्यामुळे ती चूक दुरूस्त करून राज्य सरकारने अध्यादेश राज्यपालाकडे पाठविला, असेही फडणवीस यांनी यावेळी सांगितले. १२ निलंबित आमदारांच्या बाबतीत आम्ही न्यायालयात आणि बाहेरही संघर्ष करु. आम्ही संघर्ष करणारे आहोत, सौदेबाजी करणारे नाही, असेही ते म्हणाले.

## महात्मा फुले महाविद्यालयात कर्मवीर जयंती

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली ऑनलाइन समारंभ




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३४व्या जयंतीनिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या पनवेल येथील महात्मा फुले कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या वतीने ऑनलाइन समारंभाचे आयोजन गुरुवारी (दि. २३) करण्यात आले होते. या समारंभाचे अध्यक्ष महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर हे होते.

समारंभाच्या सुरुवातीस कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांनी कर्मवीर जयंतीचे औचित्य समजावून सांगितले. यासोबतच त्यांनी महाविद्यालयाच्या वाटचालीचाही आढावा घेतला. समारंभाचे अध्यक्ष म्हणून उपस्थितांना मार्गदर्शन करताना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दातृत्व आणि कर्तृत्व यांची सांगड घालून प्रत्येक रयत सेवकाने कार्यप्रवण व्हायला हवे, असा मौलिक सल्ला दिला. प्रमुख पाहुणे 'रयत'चे ऑडिटर प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे यांनी आपल्या मनोगतात कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जीवनपट उपस्थितांसमोर उलगडून दाखविला.

या समारंभाला उपप्राचार्य डॉ. राजाराम पाटील, डॉ. नरेश मढवी, प्रा. अनिल रोकडे, आयक्यूएसी समन्वयक प्रा. सोपान गोवे, तंत्रसहायक डॉ. गिरीश गुंड यांचे विशेष सहकार्य लाभले. महाविद्यालयातील विविध विभागांचे विभागप्रमुख, प्राध्यापक व शिक्षकेतर सेवक, तसेच सर्व विद्याशाखांमधील विद्यार्थांनी प्रतिसाद दिला. सूत्रसंचालन डॉ. प्रफुल्ल वशेणीकर यांनी, तर उपस्थितांचे आभार प्रा. प्रवीण गायकर यांनी मानले.

## कळंबोली पोलीस ठाण्यात विष पिऊन गेलेल्या तरुणाचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

विषारी द्रव्य पिऊन कळंबोली पोलीस ठाण्यात गेलेल्या तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. रोहन सिताराम पाटील (वय २५, रा. चिंध्रण) असे या तरुणाचे नाव असून एका महिलेने त्याच्या विरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात लेखी तक्रार केल्याने त्याने या महिलेच्या नावाने चिठ्ठी लिहून आत्महत्या केल्याचे उघडकीस आले आहे.

रोहनचे कळंबोलीतील एका महिलेसोबत प्रेमसंबंध होते, मात्र रोहनने ब्लॅकमेल करून दागिने घेतल्याचा आरोप त्या महिलेने करून त्याच्या विरोधात कळंबोली पोलिसांत गेल्या आठवड्यात तक्रार अर्ज दिला. त्यानुसार चौकशीपूर्वीच रोहन विषारी औषध प्राशन करून पोलीस ठाण्यात गेला. या वेळी त्याने अंमलदाराच्या टेबलावर चिठ्ठी फेकून तो बेशुद्ध पडला. चिठ्ठीत त्याच्या विरोधात तक्रार करणाऱ्या महिलेच्या प्रेमापोटी आत्महत्या करत असल्याचे त्याने लिहिले होते. या वेळी रोहनला पोलिसांनी एमजीएम हॉस्पीटलमध्ये उपचारार्थ दाखल केले. त्यानंतर त्याच्या विरोधात आत्महत्येचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला, मात्र उपचारादरम्यान रोहनचा मृत्यू झाला. त्याच्या मृत्यूनंतर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून पुढील तपासाला सुरुवात केली. दरम्यान, पोलिसांनी रोहनच्या गाडीत आढळलेली विषारी द्रव्याची बाटली ताब्यात घेतली. विषारी द्रव्याचा शोध घेण्यासाठी ते तपासणीसाठी पाठवलेय. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासणीत रोहन बाहेरच विषारी द्रव्य पिऊन पोलीस ठाण्यात आल्याचे दिसून येतेय.

## लसीकरणासाठी आलेल्या नागरिकांना खाऊसह पाण्याच्या बाटलीचे वाटप

### सभापती सुशीला घरत यांचा उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस १७ सप्टेंबर रोजी साजरा झाला. त्यानिमित्त देशभरात विविध उपक्रम राबविण्यात आले होते. त्याअंतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त पनवेल महापालिकेच्या प्रभाग समिती 'ड'च्या सभापती सुशीला घरत यांच्या माध्यमातून नवीन पनवेल येथील लसीकरण केंद्रामध्ये डॉक्टर आणि लसीकरणासाठी आलेल्या नागरिकांना खाऊचे आणि पाण्याच्या बाटलीचे वाटप गुरुवारी (दि. २३) करण्यात आले.

या वेळी भाजप कार्यकर्ते जगदीश घरत, प्रशांत आवले, संदीप पाटील, विजय म्हात्रे, अनंता ठाकूर,



प्रफुल्ल पवार, शिवाजी पन्हाळे, अमित पाटील, ऐहसान खान, गजानन कडू, हरी भिसे, दीपेश जाधव, संदीप पाटील, सुदाम गायकर, लक्ष्मी चव्हाण, रंजना पाटील, शारदा माने, सीमा नरे, शोभा काशिद, मनीषा बदाने, अनिता गायकर, गौरी पवार, कल्पना ठकेकर आदी उपस्थित होते.



## अ. पां. भोईर विद्यालयातही कर्मवीरांना अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या दापोली-पारगाव येथील अनंत पांडुरंग भोईर विद्यालय व रघुनाथशेठ जितेकर ज्यु. कॉलेजमध्ये बुधवारी (दि. २२) शिक्षणाची गंगा खेडोपाड्यांपर्यंत पोहचवणारे आधुनिक भगीरथ, रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक, थोर समाजसुधारक आणि शिक्षणमहर्षी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३४वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.



कार्यक्रमाची सुरुवात कर्मवीर अण्णांच्या प्रतिमा पूजनाने झाली. विद्यालयाच्या शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य अशोक डाऊर यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. कार्यक्रमात विद्यालयाचे प्राचार्य जे. टी. कांबळे, उपमुख्याध्यापक बी. बी. साळुंके, पर्यवेक्षिका एस. एस. पाटील, तसेच विद्यालयातील सर्व सेवकवृंद उपस्थित होते. त्यानंतर इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी सुरेल 'रयत गीत' गायन केले. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून अण्णांच्या 'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद', 'कमवा व शिका' या मूल्यांची आठवण करून दिली, तसेच विद्यालयातील शिक्षिका एम. एम. पाटील आणि प्रा. आर. आर. कटके यांनी शिक्षणप्रसारक कर्मवीर अण्णांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन के. जी. भोपी यांनी केले, तर उपस्थितांचे आभार व्ही. आर. पाटील यांनी मानले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## प्रभाग १८ मध्ये परिसर स्वच्छतेविषयी जनजागृती

**नगरसेवक विक्रांत पाटील यांचा उपक्रम**

**पनवेल : वार्ताहर**

माझा प्रभाग, स्वच्छ प्रभाग अंतर्गत प्रभाग १८ला कचरामुक्त करण्यासाठी नगरसेवक विक्रांत पाटील आणि महापालिका आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने अशोक बाग आणि लोखंडी पाडा येथे रस्त्यावर कचरा न टाकण्याबद्दल नागरिकांमध्ये जनजागृती करण्याची मोहीम घेण्यात आली. नागरिकांच्या घरोघरी जाऊन त्यांना ओला, सुका आणि जैविक कचरा वेगळा करून घंटा गाडीत टाकावा, असे सांगण्यात आले.

या कार्यादरम्यान कचऱ्यामुळे रोगराई पसरते व डासांचा पण प्रादूर्भाव वाढतो हे येथील नागरिकांना समजावून सांगण्यात आले. येथील नागरिकांच्या सेवेसाठी घंटागाडी सकाळ-संध्याकाळ अशी दिवसातून दोन वेळा फेरी मारणार आहे. आपला प्रभाग स्वच्छ प्रभाग राहावा यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे आणि रस्त्यावर कचरा टाकू नये, अशी विनंती या मोहिमेंतर्गत करण्यात आली.

याचनिमित्ताने अशोक बाग आणि लोखंडी पाडा येथे डासांचा प्रादूर्भाव होऊ नये म्हणून जंतुनाशक फवारणी सुद्धा करून घेण्यात आली. माझा प्रभाग, स्वच्छ प्रभाग या मोहिमेला यशस्वीपणे राबवायला नागरिक नक्कीच सहकार्य करतील, असे मत नगरसेवक विक्रांत पाटील यांनी या वेळी व्यक्त केले.



## सेन्सेक्सची भरारी; निफ्टीतही वाढ

**मुंबई :** देशात दररोज होणारा कोरोना लसीकरणाचा रेकॉर्ड आणि जागतिक पातळीवरील सकारात्मक संकेतांच्या पार्श्वभूमीवर गुरुवारी (दि. २३) भांडवली बाजारात जोरदार तेजी दिसून आली. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स तब्बल १००० अंकांनी वधारला आणि तो ६० हजार अंकाच्या समीप पोहचला. राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीतदेखील २७० अंकाची वाढ झाली. या तेजीने गुंतवणूकदारांच्या मालमत्तेत तब्बल तीन लाख कोटींची वाढ झाली. गुरुवारी बाजार सुरू होताच सेन्सेक्सने ४५० अंकाची झेप घेतली होती. त्यानंतर ही तेजी आणखी विस्तारली. सेन्सेक्स मंचावरील ३० पैकी २६ शेअर वधारले. तर भारती एअरटेल, नेस्ले, आयटीसी आणि डॉ. रेड्डी लॅब या शेअरमध्ये घसरण झाली. बजाज फिनसर्व्ह, एल अँड टी, एचडीएफसी, एक्सिस बँक, पॉवरग्रीड, एशियन पेंट, अल्ट्राटेक सिमेंट, टेक महिंद्रा, टायटन, एनटीपीसी, बजाज फायनान्स या शेअरमध्ये वाढ झाली.

## नवी मुंबई एपीएमसी मार्केटमध्ये रक्तदान शिबिर



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

एपीएमसी दाणा बंदर बाजारात ग्रोमा संघ, निलेश वीरा फाउंडेशन व टाटा मेमोरियल हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराची सुरुवात गुरुवारी (दि. २३) आमदार मंदा म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आली.

या वेळी माजी नगरसेवक राजू शिंदे, एपीएमसी संचालक निलेश वीरा, ग्रोमा सेंटरचे अध्यक्ष शरद मारू, भीमजी भानुशाली, मयूर सोनी, घनजी भानुशाली, शशी भानुशाली, विजय भानुशाली, टाटा हॉस्पिटलच्या डॉ. जुईली चारमोडे, तसेच असंख्य व्यापारी उपस्थित होते.

या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले की, आजही कॅन्सरसारख्या रुग्णांना रक्ताची कमतरता भासू नये याकरिता रक्ताच्या २००० बाटल्या उपलब्ध करण्यात येणार असल्याचे सांगून एपीएमसी ग्रोमा व्यापारी व निलेश वीरा फाउंडेशन हे अत्यंत चांगले काम करीत आहे. नवी मुंबईतील अनेक संस्थांनी अशा कार्यास पुढाकार घेतल्यास लवकरच रोगमुक्त शहर म्हणून नवी मुंबई ओळखली जाईल. कॅन्सरसारख्या अशा विविध रोगाच्या पीडित रुग्णांना रुग्णालयात प्रवेश न मिळाल्यास त्यांना राहण्याकरिता नवी मुंबई सारख्या विकसित शहरात आरोग्य धाम उभारण्याची आवश्यकता आहे. यासाठी लवकरच सिडकोकडे मागणी करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

***सीसीटीव्हीसाठी मंदा म्हात्रेंच्या आमदार निधीतून ५० लाखांची तरतूद***

***दरम्यान, व्यापाऱ्यांनी एपीएमसीमधील वाढत्या चोरीच्या गुन्ह्यांवर आळा बसावा याकरिता सीसीटीव्ही लावण्याची मागणी करण्यात आली. आमदार मंदा म्हात्रे यांनीही एपीएमसीतील परिसरात सीसीटीव्ही उभारण्याकरिता ५० लाख रुपयांची आमदार निधीची तरतूद करणार असल्याचे सांगितले. त्यामुळे व्यापाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून सर्व व्यापारी वर्गाने त्यांचे आभार मानले.***

पान १ वरून

## एकात्म मानववादातून भाजपची 'सबका साथ, सबका विकास' ही घोषणा : आमदार प्रशांत ठाकूर

संपूर्ण जग हे भांडवलशाही आणि साम्यवादावर वादविवाद करत होते. पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी तेव्हा याचा सुवर्णमध्य साधत एकात्म मानववाद मांडला. धर्म, अर्थ, काम मोक्षाकडे नेण्यासाठी असतात हा विचारही एकात्मवादात मांडला आहे. 'एकात्म मानववाद' ही विचारधारा रुजवण्यावर भर दिला. मोदी सरकारच्या योजना साकारण्यामागेही एकात्म मानववाद आहे. पंडित दीनदयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना, स्टार्टअप इंडिया, मुद्रा बँक योजना, दीनदयाल उपाध्याय ग्राम ज्योती योजना, मुद्रा बँक योजना, मेक इन इंडिया आदी योजनांमध्येही एकात्मवादाचा विचार केला आहे. भारतीय जनता पक्षाच्या सबका साथ सबका विकास ही घोषणाही एकात्मवादाच्या विचारातून आली. ६० वर्षांपूर्वी मांडलेली एकात्म मानवतावादाची संकल्पना आजही तंतोतंत लागू पडते, असेही भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले.

## फुंडे हायस्कूलमध्ये कर्मवीर जयंती सोहळा

**उरण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेचे उरण तालुक्यातील फुंडे येथील तु. ह. वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालयात बुधवारी (दि. २२) पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा १३४वा जयंती सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला.

विद्यालयाच्या स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन कृष्णा कडू, स्कूल कमिटी सदस्य यशवंत ठाकूर, सूर्यकांत ठाकूर, रमाकांत म्हात्रे, सुरेश म्हात्रे, उमेश म्हात्रे, दर्शन घरत, मच्छिंद्र पाटील, विद्यालयाचे प्राचार्य एम. एच. पाटील, पर्यवेक्षक जी. सी. गोडगे, एस. जी. म्हात्रे, ज्युनिअर कॉलेज विभागप्रमुख व्ही. के. कुटे, कार्यालय प्रमुख एम. पी. तुमडे आदींच्या हस्ते कर्मवीर अण्णा आणि वीर वाजेकरांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर एच. एन. पाटील आणि त्यांचे सहकारी सुहास नाईक, प्रशांत पाटील यांनी रयत सेवकांची चेतना जागविणारे रयतगीत सादर केले.

ज्युनिअर कॉलेज विभागप्रमुख यांनी विद्यालयाच्या प्रगतीचा आलेख सादर केला. प्रमुख वक्ते एस. टी. म्हात्रे आणि प्रा. दिनेश सासवडे, प्राचार्य एम. एच. पाटील, कार्यक्रमाचे अध्यक्ष कृष्णा कडू यांची या वेळी भाषणे झाली. त्यानंतर 'रयत'चे अध्यक्ष शरद पवार यांच्या यूट्युब लाइव प्रक्षेपणाचे सादरीकरण करण्यात आले. शेवटी पर्यवेक्षक जी. सी. गोडगे यांनी उपस्थितांचे आभार मानले.



## सिडकोकडून पनवेल मनपाकडे होणाऱ्या सेवा हस्तांतरणाबाबत सोमवारपासून पाहणी

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिका हद्दीतील बहुतांश भाग हा सिडको प्राधिकरणाचा असल्याने त्यांच्याकडील सेवासुविधा हस्तांतरण करण्याच्या प्रक्रियेसाठी सोमवार (दि. २७)पासून सेवासुविधा पाहणी कार्यक्रम हाती घेणार असल्याचे गुरुवारी (दि. २३) आयुक्त गणेश देशमुख आणि सिडकोचे जॉईंट एमडी एस. एस. पाटील यांच्या सिडको भवन येथे झालेल्या बैठकीत ठरले.


पनवेल महापालिकेला पायाभूत सेवासुविधा, सिडकोकडील राखीव भूखंड हस्तांतरणाबाबत गुरुवारी सिडको भवनमध्ये झालेल्या बैठकीत रस्ते, फूटपाथ, मलनिस्सारण वाहिनी, एसटीपी प्लॅन्ट, इलेक्ट्रीकल व एचटी कनेक्शन्स, पथदिवे, उद्याने, खेळाची मैदाने, ट्री बेल्ट, होल्डिंग पॉन्ड्स, स्मशानभूमी, रोज बाजार, अग्निशमन या सेवा लवकरात लवकर महापालिकेकडे हस्तांतरित करण्याबाबत या वेळी चर्चा झाली.

या अनुषंगाने सोमवार (दि. २७) पासून सेवासुविधा पाहणी कार्यक्रम हाती घ्यावा, अशा सूचना अधिकाऱ्यांना करण्यात आल्या. या सेवासुविधांचे हस्तांतरण झाल्यानंतर पनवेल महापालिका त्यांची देखभाल दुरुस्ती करणार आहे. या बैठकीवेळी उपायुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त सचिन पवार, शहर अभियंता संजय जगताप, सिडको अधिकारी उपस्थित होते.

***कळंबोलीतील जम्बो कोविड सेंटरसंदर्भातही बैठक***

***कळंबोली येथील सीसीआयच्या गोदामामध्ये सुरू असलेल्या जम्बो कोविड सेंटरच्या हस्तांतरणाबाबतची बैठक झाली. जे काही अपुरे काम राहिले आहे ते लवकर पूर्ण करून येत्या काही दिवसांत हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण करू, असे आश्वासन सिडकोच्या वतीने देण्यात आले. या बैठकीस उपायुक्त सचिन पवार, शहर अभियंता संजय जगताप, डॉ. रेहाना मुजावर, सिडकोचे जॉईंट एमडी कैलास शिंदे, सुप्रिटेडिंग इंजिनीअर रमेश गिरी आदी अधिकारी उपस्थित होते.***

**दुखवटा**



## सदाशिवराव दळवी

**माणगाव :** येथील लोहित हार्डवेअरचे मालक तथा माणगाव व्यापारी असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष व सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मण दळवी यांचे वडील सदाशिवराव महादेवराव दळवी (वय ९०) यांचे बुधवारी (दि. २२) निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन सुना, नातवंडे असा परिवार आहे. कै. सदाशिवराव यांच्यावर माणगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचा दशक्रिया विधी शुक्रवारी (दि. १ ऑक्टोबर) तर उत्तरकार्य विधी (बारावे) रविवारी (दि. ३ ऑक्टोबर) माणगाव येथे होणार आहे.

## निवडक

### चिंचपाडा येथून एक जण बेपत्ता




**पनवेल :** चिंचपाडा येथील एक व्यक्ती केस कापून येतो असे सांगून गेला आणि पुन्हा परतलाच नाही. याबाबत मुलगा महेश वाघमारे यांनी शहर पोलीस ठाण्यात हरविल्याची तक्रार दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी नोंद केली असून अधिक तपास करीत आहेत. बाळू महादेव वाघमारे असे बेपत्ता व्यक्तीचे नाव असून वय ५१ वर्षे, धंदा हमाली, उंची पाच फूट सात इंच, रंग गोरा, अंगाने मध्यम, नाक सरळ, मिशी बारीक कापलेली, दाढी काळी-पांढरी, डाव्या हातात लाल धागा बांधलेला, अंगात पांढरा शर्ट, काळी पॅन्ट, पायात चप्पल, भाषा मराठी असे बाळू यांचे वर्णन आहे. अशा वर्णनाची व्यक्ती कोठे आढळल्यास शहर पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### भजन स्पर्धेत रूपेश पाटील प्रथम

**पनवेल :** ऑनलाइन गुरू पुष्पांजली भजन स्पर्धा २०२१ या स्पर्धेत रूपेश पाटील याने प्रथम क्रमांक पटकावला आहे. आभार संस्था रत्नागिरी संचलित, रत्नागिरी जिल्हा प्रासादिक भजन मंडळ यांच्या सहयोगाने सागरी सीमा मंच कोकण प्रांतच्या वतीने कोकण विभागीय ऑनलाइन गुरुपुष्पांजली भजन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत मुंबई उपनगर विभागातून नेरे येथील श्री ग्रामदेवता प्रासादिक भजन मंडळातर्फे रूपेश पाटील याने प्रथम क्रमांक पटकावला आहे. या यशाबद्दल त्याचे अभिनंदन केले जात आहे.

# डेंग्यू, मलेरियाच्या रुग्णसंख्येत वाढ



## नवी मुंबई शहरात डासांचा प्रादूर्भाव

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई शहरात डासांचा प्रादुर्भाव वाढल्याने डेंग्यू, मलेरियाच्या रुग्णांची संख्या वाढली आहे. नवी मुंबईतील दिघा, ऐरोली, घणसोली, कोपरखैरणे, पावणे, महापे, तुर्भे आदी भागात डेंग्यू, मलेरियाचे संशयित रुग्ण मोठ्या संख्येने आढळत आहेत. या भागांमध्ये आरोग्य विभागाकडून धुरीकरण आणि कीटकनाशक फवारणी करण्यात आली. तरी, रुग्णसंख्या वाढत असल्याने नवी मुंबई महापालिकेने घरोघरी शोधमोहीम सुरू केली आहे.

ऐरोली, घणसोली, कोपरखैरणे, तुर्भे या भागातील सर्व खासगी डॉक्टरांकडे रुग्णांची गर्दी होत आहे, परंतु तरी महापालिकेच्या आरोग्य विभागाकडे डेंग्यूचे जानेवारीपासून आठ रुग्ण आढळल्याची नोंद आहे. त्यामुळे खासगी लॅबमधून समोर येणाऱ्या अहवालांवर पालिकेतर्फे नजर ठेवली जाणार आहे.

एमएमआर क्षेत्रात डेंग्यूच्या रुग्णांची संख्या वाढत आहे. सध्या बदलते हवामान, मोकळ्या भूखंडावर गवत वाढल्याने डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. झोपडपट्टी बहुल आणि गावठाणातील चाळींमध्येही डेंग्यूची लक्षणे असणाऱ्या रुग्णांमध्ये वाढ होत आहे.

नवी मुंबईत सध्या डेंग्युच्या रुग्णांची संख्या वाढत आहे. या पार्श्वभूमीवर मलेरिया, डेंग्यू प्रतिबंधात्मक उपाययोजनांना योग्य दिशेने गती देण्याच्या दृष्टीने महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी विशेष बैठक आयोजित केली होती. या वेळी आयुक्त अभिजीत बांगर यांनी महापालिका क्षेत्रातील डेंग्यूच्या स्थितीचा नागरी आरोग्य केंद्रनिहाय सविस्तर आढावा घेत डेंग्यू प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. दरम्यान, डेंग्यूचा संशयित रुग्ण आढळल्यानंतर त्याच्यावर योग्य वैद्यकीय उपचार होणे गरजेचे असून त्यादृष्टीने नागरी आरोग्य केंद्रांचे वैद्यकीय अधिकारी तसेच वाशी रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक यांनी समनव्य राखून काळजी घेण्याचा सल्ला दिला होता.

### पालिका प्रशासनाने प्रभावी उपाययोजना करण्याची मागणी

*कोरोनाला रोखण्यासाठी ज्याप्रमाणे हॉटस्पॉट निश्चित करून लक्ष केंद्रीत केले जाते, त्याचप्रमाणे डेंग्यूचा संशयित रुग्ण आढळल्यास त्या भागाकडे लक्ष केंद्रीत करून प्रतिबंधात्मक उपाययोजना अधिक प्रभावीपणे राबविण्याची कार्यवाही करावी. डेंग्यूचा प्रसार रोखण्यासाठी मादी आढळल्यानंतर संबंधित घरासह त्या परिसरातील १०० घरांचे सर्वेक्षण करून प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात येते, ती अधिक प्रभावीपणे राबविण्यास तत्परतेने सुरुवात करावी. अधिक बारकाईने डास उत्पत्ती ठिकाणांचा शोध घेऊन ती त्वरित नष्ट करण्याची कार्यवाही करावी. तसेच डासनाशक फवारणी करण्याची कार्यवाहीदेखील अधिक प्रभावीपणे करण्यात यावी, असे निर्देश आयुक्तांनी दिले. तर परिसरात वाढत्या डेंग्यू आणि हिवताप रुग्णांमुळे डासनाशक फवारणी करण्याची मागणी नागरिकांनी नेरूळ विभाग अधिकारी यांच्याकडे केली आहे.*

## ऑनलाइन दंड मुदतीत न भरल्यास वाहनचालकांना न्यायालयातर्फे नोटीस



**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील वाहचालकांना ऑनलाइन दंड भरण्यासाठी २५ सप्टेंबरची अखेरची मुदत देण्यात आली असून उरण न्यायालयात लोकदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. ऑनलाइन दंड आकारलेल्या वाहनचालकांनी २५ सप्टेंबरपूर्वी दंड न भरल्यास संबंधित वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. नवी मुंबई पोलीस आयुक्तालयांतर्गत असणाऱ्या पोलीस वाहतूक विभागांच्या वतीने या वाहनचालकांकडून प्रलंबित दंड वसुलीबाबत विशेष मोहीम राबविण्यात आली आहे.

ऑनलाइन दंडात्मक कारवाई करण्यात आलेल्या सर्व वाहनचालकांना प्रलंबित दंड भरण्याचे आवाहन नवी मुंबई वाहतूक पोलिसांनी केले आहे. www.mahatrafficechallan.gov.in या पेमेंट पोर्टलच्या माध्यमातून mahatraffic app द्वारे E challa devise मधून दंड भरण्याचे आवाहन २५ सप्टेंबरपर्यंतच्या मुदतीचे आवाहन करण्यात आले आहे. उरण वाहतूक शाखेने प्रलंबित दंडाची चार लाख सहा हजार २०० रुपये तर न्हावा शेवा वाहतूक शाखेने दोन लाख एवढी प्रलंबित दंडाची वसुली केली आहे.

उर्वरित वाहनचालकांनी २५ सप्टेंबरपर्यंतच्या मुदतीत ऑनलाईन दंडाची रक्कम न भरल्यास संबंधितांना उरण न्यायालयातर्फे नोटीसा येऊ शकणार आहेत. त्यामुळे उरण न्यायालयाचे लोकअदालत होण्यापूर्वी वाहनचालकांनी प्रलंबित दंडाची रक्कम न भरल्यास कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागणार असल्याची माहिती उरण वाहतूक शाखेकडून देण्यात आली आहे.

## चिखलेतील विजय आर्मी स्कूलमध्ये प्रवेश प्रक्रिया

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील चिखले येथील विजय आर्मी स्कूल ॲण्ड ज्यु. कॉलेजमध्ये इयत्ता सहावी ते दहावी (सेमी इंग्रजी) व अकरावी, बारावी (विज्ञान)साठी प्रवेश देणे सुरू आहे.

बलदंड शरीर, निरोगी मन, प्रखर राष्ट्रभिमान असणारी तरुण पिढी घडविण्यासाठी विद्यार्थ्यांची मानसिक व शारिरीक जडणघडण करणे हेच सैनिकी शाळेचे ध्येय आहे. या सैनिकी शाळेत शालेय शिक्षणाबरोबरच सैनिकी प्रशिक्षण, स्पर्धा परीक्षा (एनडीए) तयारी, सामान्य ज्ञान (जीके), हत्यार प्रशिक्षण, पोहणे, घोडेस्वारी, विविध खेळ, सहली, कमांडरची नियुक्ती, सुसज्ज विद्यार्थी वसतिगृह, विविध शिबिरे, युध्द कौशल्य, वैद्यकिय सुविधा, सुसज्ज कॉम्पुटर हॉल, निसर्गरम्य परिसर इन्वर्टरची सोय, ॲक्वागार्ड युक्त पाणी आदी शाळेची ठळक वैशिष्टये आहेत. अधिक माहितीसाठी व प्रवेशाबाबत ८८०५९९८१६५, ९५६१४०६८८२, ८३९०३५९२९८, ९४२१६३६१३२ या क्रमांकावर संपर्क साधावा.



**कामोठे : पनवेल महापालिका क्षेत्रात राष्ट्रीय जंतनाशक मोहीम राबविण्यास सुरुवात झाली आहे. या मोहिमेंतर्गत येथील प्राथमिक शाळेत १ ते १९ वर्षे वयोगटातील मुलामुलींना नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांच्या हस्ते गुरुवारी जंतनाशक गोळ्यांचे निःशुल्क वाटप करण्यात आले.**

## उरणमध्ये एकाच कुटुंबातील सात जणांना अन्नातून विषबाधा

**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

केगाव हद्दीतील विनायक डोंगरआळीमध्ये एकाच कुटुंबातील सात जणांना चायनीज फ्राइड राईस खाल्ल्याने विषबाधा झाली. इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयात सर्वांना उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.



विषबाधा झालेल्यांची नावे अर्णव पाटील (वय ९), सिद्धार्थ ठाकूर (वय १०), सानिया म्हात्रे (वय १५), आर्या म्हात्रे (वय ७), रिता ठाकूर (वय ३८), सिया निळकमल थळी (वय ९), सुजल ठाकूर यांना विषबाधा झाली आहे.

विनायक डोंगरआळी राहणारे नथुराम पाटील यांच्या घरी पाहुणे आले होते. बुधवारी रात्री ९च्या सुमारास शहरातील चायनीजच्या गाडीवरून चायनीज फ्राईड आणले होते. ते पाहुण्यांमधील सात लहान मुलांनी खाल्ल्यानंतर थोड्याच वेळेत मुलांना उलट्या होऊ लागल्या. त्यांना इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करून त्यांच्यावर उपचार सुरू करण्यात आले. सर्वांची तब्येत आता व्यवस्थित असल्याचे रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. गौतम देसाई यांनी सांगितले.

पाटील कुटुंबीयांनी चायनीज टपरी मालकाविरुद्ध मोरा सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविला आहे.

## स्व. अण्णासाहेब पाटील यांच्या जयंतीनिमित्त नवी मुंबईत कार्यक्रम

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

दरवर्षीप्रमाणे या ही वर्षी २५ सप्टेंबर रोजी स्व. अण्णासाहेब पाटील यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे नवी मुंबईत आयोजन करण्यात आले आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर कमी संख्येने कार्यक्रम घेण्याबाबत सूचना प्राप्त झाल्याने ज्या माथाडी कामगारांचे लसीचे दोनही डोस झाले असतील तसेच ज्यांच्याकडे राज्य शासनाचे 'युनिव्हर्सल पास' असेल अश्याच लोकांना या कार्यक्रमाचे आमंत्रण देण्यात आले आहे.

जे उपस्थित राहणार आहेत त्यांचे दोनही डोस झाले असावेत. आणि याच लोकांच्या माध्यमातून हा कार्यक्रम होणार असल्याचे नरेंद्र पाटील यांनी सांगितले. त्याचबरोबर फेसबुक लाईव्ह तसेच टीव्ही चॅनेलच्या माध्यमातून हा कार्यक्रम प्रत्येकाने घरी पाहता यावा अशाप्रकारचे नियोजन ही करण्यात आले असल्याचे पाटील यांनी सांगितले.


२५ सप्टेंबर रोजी होणाऱ्या या कार्यक्रमास देशाचे कामगार मंत्री भुपेंद्र यादव, मुख्यमंत्री उध्दव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस, आमदार गणेश नाईक, आमदार मंदा म्हात्रे, आमदार प्रसाद लाड, आमदार निरंजन डावखरे, माजी आमदार संदीप नाईक आदी उपस्थित राहणार असल्याचेही या वेळी नरेंद्र पाटील यांनी सांगितले.

## रसायनी परिसरातील गावठी हातभट्टी पोलिसांकडून उद्ध्वस्त

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आपटा दाभोळ आदिवासीवाडी आणि काळीवली आदिवासीवाडीच्या डोंगराळ भागात बेकायदा गावठी दारूची हातभट्टी असल्याची माहिती रसायनी पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलीस निरीक्षक कैलास डोंगरेंच्या मार्गदर्शनाखाली रसायनी पोलिसांनी छापा टाकला व हातभट्टी उद्ध्वस्त केली.

आपटा दाभोळ आदिवासीवाडीतील राम धर्मा वाघे (वय ४०) याने व काळीवली आदिवासीवाडी येथील चंदर वाघे (वय ४०) याने गैरकायदा विनापरवाना गावठी हातभट्टीची दारू आपल्या ताबे कब्जात बाळगली होती. या कारवाईत रसायनी पोलिसांना १२४०० रुपये किमतीचे एकूण निळ्या रंगाचे दोन प्लास्टिकच्या ड्रममध्ये २०० लिटरप्रमाणे दारू तयार करण्याचे तांबड्या रंगाचे उग्र वास येत असलेला मिश्रीत द्रव्य, एक लिटरप्रमाणे तीस रुपये



किमतीच्या ड्रमसह ६१०० रुपये किमतीच्या दोनशे लिटर क्षमतेच्या पत्र्याच्या टाकीत दारू बनविण्याचे साहित्य, ३१०० रुपयांचा शंभर लिटर क्षमतेचा प्लास्टिक ड्रम, ६२० रुपये किमतीचा वीस लिटर क्षमतेचा प्लास्टिक कॅन दारु साहित्यासह आढळून आला. या प्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात म.प्रो.ॲक्ट ६५ खंड (इ)क.फ.अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हेगारांच्या मुसक्या आवळल्या जात असल्याने रसायनीकर समाधान व्यक्त करत आहेत.

## नवी मुंबईत ९५ टक्के नागरिकांनी घेतला पहिला डोस

### महापालिकेकडून कोरोना लसीकरणावर भर

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई महापालिकेच्या वतीने कोविड लसीकरणावर भर दिला जात असून आत्तापर्यंत १० लाख तीन हजार ७१ नागरिकांनी म्हणजेच ९५ टक्के नागरिकांनी कोविड लसीचा पहिला डोस घेतला आहे आणि चार लक्ष ५८ हजार १९५ म्हणजे ४३ टक्के नागरिकांनी कोविडचे दोन्ही डोस घेतले आहेत. लोकसंख्येच्या तुलनेत लसीकरणाचे हे प्रमाण इतर मोठ्या शहरांच्या तुलनेत सर्वाधिक आहे.

सप्टेंबर महिन्यात कोविड लसीचा साठा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध झाल्याने १०० लसीकरण केंद्रे कार्यान्वित करीत आयुक्त अभिजित बांगर यांच्या निर्देशानुसार जास्तीत जास्त नागरिक लसीकरणाद्वारे संरक्षित करण्यावर भर देण्यात आलेला आहे. सप्टेंबर महिन्याच्या २० दिवसांत एक लाख ४६ हजार ६२७ नागरिकांनी पहिला डोस तसेच एक लाख २० हजार ४३९ नागरिकांनी दुसरा डोस घेतला असून एकूण दोन लाख ६७ हजार ६६ इतके डोस देण्यात आलेले आहे. विशेष म्हणजे ८ सप्टेंबर रोजी ३४११२ इतक्या मोठ्या संख्येने एका दिवसातील विक्रमी लसीकरण झालेले आहे.



### लसीकरणाला गतिमानता

***संभाव्य तिसऱ्या लाटेपूर्वी जास्तीत जास्त नागरिक लसीकरणाद्वारे संरक्षित व्हावेत याकरिता लसीच्या उपलब्धतेनुसार नवी मुंबई महापालिकेच्या वतीने लसीकरणाला गतिमानता देण्यात येत असून त्यानुसार सत्रांचे दैनंदिन नियोजन करण्यात येत आहे. ९५ टक्केहून अधिक नागरिकांनी लसीकरणाचा पहिला डोस घेतलेला आहे ही समाधानकारक बाब आहे.***

लसीच्या उपलब्धतेनुसार १८ वर्षांवरील नागरिकांसाठी कोविडचा पहिला डोस उपलब्ध करून देण्याप्रमाणेच ज्यांच्या दुसऱ्या डोसची तारीख आलेली आहे त्यांना दुसरा डोस उपलब्ध करून देण्याकडेही बारकाईने लक्ष दिले जात आहे. त्यासोबतच मोठ्या प्रमाणावर नागरिकांच्या संपर्कात येत असलेल्या कोविडच्या दृष्टीने जोखमीच्या पोटँशिअल सुपरस्प्रेडर्स व्यक्तींच्या लसीकरणाकडेही सुरूवातीपासूनच लक्ष देण्यात आले असून आयुक्तांच्या निर्देशानुसार विविध क्षेत्रांतील व्यक्तींसाठी विशेष लसीकरण सत्रांचे २५ जूनपासून आयोजन करण्यात येत आहे.

**कोरोना लसीकरण झाल्यानंतरही मास्कचा नियमित व योग्यप्रकारे वापर करणे गरजेचे असून चेहऱ्याला स्पर्श न करणे, वारंवार हात धुणे, सुरक्षित अंतर राखणे असे कोविड प्रतिबंधात्मक नियमही प्रत्येकाने आपली नियमित सवय बनविली पाहिजे.**

**-अभिजित बांगर, आयुक्त, नवी मुंबई महापालिका**

## गणेश विसर्जन करताना बुडणाऱ्याला वाचवले

### पोलीस अंमलदार प्रशांत वाघ यांचे कौतुक



**कळंबोली : प्रतिनिधी**

गणेश विसर्जन करताना पाण्यात बुडालेल्या एका गणेश भक्ताचे नवी मुंबई एनआरआय पोलीस ठाण्याच्या पोलीस अंमलदार यांनी स्वतः पाण्यात उडी मारून गणेश भक्ताचे प्राण वाचवले आहे. या कामगिरीनंतर पोलीस अंमलदार प्रशांत वाघ यांचे सर्व स्तरावर कौतुक केले जात आहे.

गणेश विसर्जनादरम्यान सुरेश शिंदे हे पाण्यात उतरले असता ते पाण्यात बुडत आहेत असे प्रशांत वाघ याच्या निदर्शनात आले व त्यानंतर प्रशांत वाघ यांनी कामगिरी बजावत असतानाच वहाळ येथील गणेश विसर्जन तलावात उडी मारून सुरेश शिंदे यांचे प्राण वाचविले.

पाण्यात बुडत असणाऱ्या सुरेश यांना पाण्याच्या बाहेर काढल्यानंतर वाघ यांनी त्यांना तोंडाद्वारे श्वासोच्छवास देऊन प्राथमिक उपचार करत त्यांना नजीकच्या इस्पितळात दाखल केले. या जिगरबाज पोलिसाच्या कामगिरीनंतर नवी मुंबई पोलीस खात्याकडून तसेच सामाजिक क्षेत्रातून प्रशांत वाघ यांचे कौतुक केले जात आहे.

## कोरोना काळात पेन किलर गोळ्यांच्या वापरात वाढ

**पनवेल : वार्ताहर**

कोरोना काळात पेन किलर गोळ्यांचा वापर वाढला असून ते आरोग्यासाठी धोकादायक आहे. आपल्या शरीराला काही त्रास झाला तर पेन किलर गोळी घेण्याचे आपल्यावर जणू संस्कारच झाले आहे, परंतु पेनकिलर गोळ्यांचे अतिसेवन हे आरोग्यासाठी त्रासदायक आहे.

अमेरिकन क्रोनिक पेन असोसिएशनद्वारा संपूर्ण जगभर सप्टेंबर हा महिना हा वेदना जागरूकता महिना म्हणून साजरा केला जातो. याविषयी अधिक माहिती देताना स्टारसिटी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक व ज्येष्ठ फिजिशियनव व छातिरोग तज्ञ डॉ. प्रवीण भुजबळ म्हणाले, अंग दुखणे म्हणजेच आपल्या शरीराला सतत त्रास होत राहणे होय. छातीत दुखणे, गुडघे व सांधे दुखणे, तसेच जे नागरिक उदरनिर्वाहासाठी अंगमेहनतीची कामे करतात ते अंगदुखीनी बेजार असतात. आपल्याकडे अंगदुखी व पेनकिलर ही नवरा बायकोची जोडी झाली आहे. अनेक नागरिक वर्षानुवर्षे अंगदुखीसाठी पेन किलरचा वापर करीत असतात. प्रामुख्याने संसर्गजन्य ताप, मलेरिया, टायफॉइड, डेंग्यू, अशा आजारांमध्ये तापासोबत अंग दुखते. काहीवेळा शरीरातील डी जीवनसत्व कमी असल्याने सांधेदुखी होते. दात दुखणे, हातापायात वेदना होणे, डोकेदुखी अशा सर्वसाधारण आजारांमध्ये अनेकजण मेडिकल दुकानात जाऊन पेन किलर घेतात त्यामुळे त्यांना तात्पुरता आराम मिळतो, परंतु त्या आजाराची कारणे शोधली पाहिजेत.

कोरोनाच्या पहिल्या लाटेत जी औषधे वापरली गेली त्या औषधांचा वापर दुसऱ्या लाटेत कमी झाला, परंतु आजही अनेक पहिल्या लाटेचीच प्रिस्क्रिप्शन वापरले जाते. आजकाल सोशल मिडीयाच्या माध्यमातून प्रिस्क्रिप्शन शेअर केली जातात व ते धोकादायक आहे. अनेकवेळा हृदयविकार, ब्रेन स्ट्रोक या आजाराची सौम्य लक्षणे दिसल्यावर अनेकजण पेनकिलर गोळ्यांच्या मारा करतात. त्यामुळे पुढील काही दिवस ती लक्षणे दिसत नाहीत व आजार बरा झाल्याची रुग्णाला खात्री वाटते, परंतु तोच आजार थोड्याच दिवसांनी परत उफाळून येतो व त्यावेळी त्याचे निदान करणे कठीण जाते. पेनकिलरच्या अतीसेवनामुळे किडनी व हृदयाला धोका निर्माण होऊ शकतो.

## संपादकीय

# कधी थांबणार बलात्कार?

तब्बल २९–३० समाजकंटकांनी सुमारे आठ महिने एका अल्पवयीन मुलीवर वारंवार बलात्कार करावेत ही अंगावर शहारे आणणारी गोष्ट आहे. कुठलाही सुजाण नागरिक यामुळे शरमेने मान खाली घातल्याशिवाय राहणार नाही. डोंबिवलीतील या बलात्कार प्रकरणाचे पडसाद आता देशभर उमटतील किंबहुना प्रसारमाध्यमे हे काम आवर्जून करतील. यामुळे महाराष्ट्राची उरलीसुरली अब्रूदेखील नष्ट होणार आहे.

देशभरातील महिलांवरील अत्याचारांचे गुन्हे आणि त्यांची आकडेवारी गोळा करून माननीय राज्यपालांना अविचाराने ‘दुरुत्तर’ पाठवणाऱ्या महाविकास आघाडी सरकारला आता तरी खडबडून जाग येण्याची गरज आहे. साकीनाका येथे झालेल्या एका महिलेच्या निर्घृण हत्येनंतर देशभर खळबळ उडाली होती. २०१२ साली राजधानी दिल्लीत झालेल्या निर्भयाकांडाची आठवण करून देणारा हा प्रकार होता. याच घटनेनंतर माननीय राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र पाठवून राज्यातील महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण वाढल्याबद्दल चिंता व्यक्त केली होती. त्यांना उत्तर पाठवताना महाविकास आघाडी सरकारमध्ये बसलेले नेते आपला राजकीय रंग दाखवून गेले. महिलांवरील अत्याचार ही राष्ट्रीय समस्या असून त्याचे राष्ट्रीय पातळीवरच समाधान निघाले पाहिजे अशा अर्थाचे अत्यंत अपरिपक्वपणे लिहिलेले पत्र राज्यपालांकडे धाडण्यात आले. डोंबिवलीसारख्या मध्यमवर्गीय व सुशिक्षित म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शहरामध्ये गुरुवारी आणखी एक भयंकर प्रकार उघडकीस आला. एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याप्रकरणी २३ जणांची धरपकड करण्यात आली. या २३ जणांव्यतिरिक्त आणखी सहा जण फरारी आहेत. असले प्रकार बातम्यांमधून उघडकीस आल्यानंतर कोणालाच ते रूचणारे नसते. रूचणे हा शब्दप्रयोग दूरच राहिला, जनमानसामध्ये एक प्रकारची चीड निर्माण होते. सामान्य माणूस शक्यतो कधीही आपला संताप उघडपणे व्यक्त करत नाही. शेजाऱ्यापाजाऱ्यांमध्ये किंवा परिचयातील वर्तुळात थोडीफार हळहळ व्यक्त करणे होते आणि चार दिवसांनी मामला थंड पडतो. याचा अर्थ सामान्य माणसे असले प्रकार विसरतात असे मात्र नव्हे. जनतेची ही चीड मतपेटीतून व्यक्त होतेच होते. असेच प्रकार चालू राहिले तर महाविकास आघाडी सरकारला जनताच पळता भुई थोडी करेल याची जाणीव सत्ताधाऱ्यांनी ठेवलेली बरी. बलात्कारासारख्या प्रकरणात राजकारण आणणे चुकीचेच आहे. एखाद्या अबलेवर झालेला बलात्कार हा राजकारणाचा मुद्दा होऊ शकत नाही ही भारतीय जनता पक्षाची पूर्वीपासूनचीच भूमिका आहे, परंतु याचा अर्थ जनतेच्या संतापाला वाचाच फोडायची नाही अशी अपेक्षा विरोधी पक्षाकडून करणे चुकीचे ठरेल. डोंबिवलीतील कथित प्रकरण गेले आठ महिने सुरू होते. एका गरीब बिचाऱ्या मुलीवर जो प्रसंग आला तो कोणा वैऱ्यावर देखील येऊ नये. तथापि सुशिक्षितांच्या शहरामध्ये असल्या प्रकारची निर्घृण घटना आठ महिने घडत राहते आणि पोलीस यंत्रणेला त्याचा सुगावा देखील लागत नाही, हे कशाचे लक्षण आहे? संबंधित दुर्भागी मुलीने ही बाब उघड केल्यानंतर २३ जणांची धरपकड करण्यात आली. येत्या काही दिवसांत हे प्रकरण प्रसिद्धीमाध्यमांमध्ये गाजत राहील. त्यामुळे महाराष्ट्राची अब्रू मात्र धुळीला मिळत राहील. सत्ताधारी आघाडी मात्र इतर राज्यांमध्ये होणाऱ्या महिलांवरील अत्याचारांचा आणि बलात्कारांचा हिशेब गोळा करत राहील. असे किती दिवस चालणार? कुठे ना कुठे हे थांबायला हवे.

# महाविकास आघाडीत महानाराजी

**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

गेली दोन वर्षे रायगड जिल्ह्यातील राजकीय वातावरण शांत होते, परंतु मागील तीन दिवसांपासून रायगडचे वातावरण तापू लागले आहे. शिवसेना नेते माजी केंद्रीय मंत्री अनंत गीते यांनी श्रीवर्धन येथील एका कार्यक्रमात राष्ट्रवादी काँग्रेसवर हल्लाबोल केला. त्याच्या दुसऱ्याच दिवशी काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष महेंद्र घरत यांनीदेखील पत्रकारांशी बोलताना राष्ट्रवादीच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त केली. शिवसेना नेते राज्याचे उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी माणगाव येथे रायगडातील शिवसेना नेत्यांची बैठक घेतली. त्यातही शिवसेना नेत्यांनी राष्ट्रवादीवर नाराजी व्यक्त केली. शेकापदेखील राष्ट्रवादीवर नाराज आहे. हे सर्व पक्ष राज्याच्या सत्तेत राष्ट्रवादी काँग्रेससोबत महाविकास आघाडीचे घटक पक्ष आहेत. असे असताना महाविकास आघाडीतील घटक पक्ष उघड नाराजी व्यक्त करत आहेत. रायगड जिल्ह्यातील या पक्षांची नाराजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाविरोधात दिसत असली, तरी खरी नाराजी जिल्ह्यात डोईजड होत असलेले राष्ट्रवादीचे खासदार सुनिल तटकरे यांच्या विरोधात आहे. तटकरेंना कोंडीत पकडण्यासाठी सर्वांचे प्रयत्न सुरू आहेत.

विधानसभा निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर राज्यातील राजकीय परिस्थिती बदलली. जे पक्ष एकमेकांविरोधात लढले होते ते काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना हे तीन पक्ष एकत्र आले. त्यांनी महाविकास आघाडी स्थापन करून राज्यात सत्ता आणली. सत्ता मिळवण्यासाठी केलेली ही तडजोड होती. ही तडजोड वरिष्ठ नेत्यांना मान्य असली तरी स्थानिक नेत्यांना ती मान्य नव्हती. रायगड जिल्ह्यात राष्ट्रवादीसोबत जाण्यास शिवसेनेचे नेते तयार नव्हते, तरीदेखील पक्षप्रमुखांच्या आदेशामुळे ही तडजोड स्वीकारली गेली.



रायगड जिल्ह्यात सात विधानसभा सदस्य निवडून आले. त्यापैकी शिवसेनेचे तीन आहेत. भाजपचे तीन व राष्ट्रवादीचा एक सदस्य आहे. राज्यात सत्ता आल्यामुळे रायगडातील शिवसेनेच्या एखाद्या आमदाराला मंत्रिपद मिळेल, अशी अपेक्षा होती. परंतु तसे झाले नाही. राष्ट्रवादीच्या आदिती तटकरे यांना मंत्रिपद मिळाले. त्यानंतर किमान रायगडचे पालकमंत्रिपद शिवसेनेच्या मंत्र्याकडे जाईल अशी आशा शिवसैनिकांना होती, तीदेखील फोल ठरली. तेव्हापासून जिल्ह्यातील शिवसैनिक नाराज होते. विकासनिधी मिळत नाही. जिल्हा नियोजन समितीचा निधी देताना दुजाभाव केला जातो. शासकीय कार्यक्रमांमध्ये शिवसेनेच्या आमदारांना डावलेले जाते अशी नाराजी शिवसेनेचे नेते व्यक्त करत होते. परंतु जाहीर सभेत उघडपणे बंडाची भाषा कुणी करत नव्हते. शिवसेनेच्या नेत्यांमध्ये जी नाराजी होती, ती जाहीरपणे व्यक्त करण्याचे काम माजी केंद्रीय मंत्री अनंत गीते यांनी केले.

सहा वेळा खासदार म्हणून निवडून आलेल्या गीते यांचा सुनिल तटकरे यांनी २०१९ मध्ये पराभव केला. तेव्हापासून अनंत गीते राजकीय कार्यक्रमांमध्ये दिसले नाहीत. ते दोन वर्षांनंतर श्रीवर्धन मतदारसंघातील शिवसैनिकांच्या मेळाव्यात दिसले. या पहिल्याच कार्यक्रमात त्यांनी बॉम्ब टाकला. या कार्यक्रमात त्यांनी केलेल्या वक्तव्यामुळे संपूर्ण राज्यात खळबळ उडाली. दोन्ही काँग्रेस जर एक होऊ शकत नाहीत, तर शिवसेना आणि काँग्रेस कदापी एक होऊ शकत नाहीत. राष्ट्रवादी काँग्रेसचा जन्मच मुळात काँग्रेसच्या पाठीत खंजीर खुपसून झालाय, असा घणाघात गीते यांनी केला. महाविकास आघाडी सरकार ही केवळ सत्तेसाठीची तडजोड आहे, असं अनंत गीते म्हणाले. उद्या ही आघाडी संपुष्टात आली तर तुम्ही तटकरेंकडे जाणार का? असा सवालही गीते यांनी उपस्थित शिवसैनिकांना केला. गीतेंनी जरी राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्यावर टीका केली तरी त्यांचा खरा राग हा खासदार सुनिल तटकरे यांच्यावर आहे. तटकरे शिवसेनेला जुमानत नाहीत. ते डोईजड होत चालले आहेत. त्यांना रोखायचे असेल तर आक्रमक व्हायला हवे. त्यांची कोंडी केली पाहिजे. हे गीते आळखून आहेत. त्यामुळेच राजकीय तडजोड म्हणून राज्यातील महाविकास आघाडीत आम्ही सोबत असलो तरी रायगड जिल्ह्यात आमचा मार्ग वेगळा असेल असा इशाराच अनंत गीते यांनी श्रीवर्धनमध्ये येऊन शिवसेनेच्या मेळाव्यातून खासदार सुनिल तटकरे यांना दिला आहे.

### काँग्रेसही आक्रमक

जी बाब शिवसेनेची आहे. तीच काँग्रेसची आहे. काँग्रेसनेदेखील सुनिल तटकरे यांच्या कार्यपध्दतीवर नाराजी व्यक्त केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत काँग्रेसने राष्ट्रवादीला मदत केली. सुनिल तटकरे यांच्या कन्या आदिती तटकरे यांना रायगड जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष करताना काँग्रेसच्या तीन सदस्यांनी त्यांना पाठिंबा दिला. त्या बदल्यात काँग्रेसला एकही सभापतीपद मिळाले नाही. लोकसभा निवडणुकीत काँग्रेसच्या नेत्यांनी सुनिल तटकरे यांचे काम केले. तटकरे निवडून आले, परंतु विधानसभा निवडणुकीत त्यांनी काँग्रेसच्या उमेदवारांना मदत केली नाही. जिल्ह्यात काँग्रेसचा एकही आमदार निवडून आला नाही. आमच्या मतांवर मोठे झाले व नंतर आम्हाला विसरले, अशी नाराजी काँग्रेसचे माजी आमदार कै. माणिकराव जगताप करायचे. ते सुनिल तटकरे यांच्यावर उघड टीका करायचे. काँग्रेसचे विद्यमान जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनीदेखील तीच खंत व्यक्त केली. त्यांनीदेखील फसवणाऱ्यांना जशास तसे उत्तर देऊ अशी आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यांचा रोख सरळसरळ खासदार सुनिल तटकरे यांच्यावरच आहे.

एकूणच खासदार सुनिल तटकरे डोईजड होत असल्यामुळेच शिवसेना, काँग्रेस व शेकाप नेते त्यांच्या विरोधात आक्रमक झाले आहेत. हे तीनही पक्ष खासदार तटकरेंना कोंडीत पकडण्याच्या तयारीत आहेत. आगामी जिल्हा परिषद निवडणुकीत हे तीनही पक्ष कोणती भूमिका घेतात यावर रायगड जिल्ह्यातील राजकारणाची पुढील दिशा अवलंबून राहील.

### शेकाप नाराज

*रायगड जिल्हा परिषदेत शेकाप हा मोठा पक्ष आहे. राष्ट्रवादीचे १२ सदस्य निवडून आले होते. असे असताना सुनिल तटकरे यांच्या कन्या आदिती तटकरे यांना जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद देण्यात आले. लोकसभा निवडणुकीत शेकापने सुनिल तटकरे यांना पाठिंबा दिला, परंतु विधानसभा निवडणुकीत शेकापचा पराभव झाला. विशेषतः अलिबाग विधानसभा मतदारसंघात झालेला पराभव शेकापच्या जिव्हारी लागला आहे. अलिबाग विधानसभा मतदारसंघात रोहा तालुक्यातील चणेरे आणि मुरूड तालुक्यातील दोन जिल्हा परिषद मतदारसंघांचा समावेश आहे. त्या ठिकाणी राष्ट्रवादीची ताकत आहे, मात्र तेथे शेकाप उमेदवार पंडित पाटील पिछाडीवर राहिले. त्यामुळे शेकाप नेते खासदार तटकरे यांच्यावर नाराज झाले. विधानसभा निवडणुकीनंतर सुनिल तटकरे आणि शेकापचे जयंत पाटील यांचे संबंध बिघडले. दोघांमध्ये सध्या अबोला आहे. आम्ही मागून खंजीर खुपसत नाही, समोरून वार करतो, अशा शब्दात आमदार जयंत पाटील यांनी खासदार तटकरे यांच्यावर नाराजी व्यक्त केली होती. त्यांचे हे वक्तव्य बरेच काही सांगून जाणारे होते.*

# नागरिकांनी लसीकरण करून घ्यावे

## आमदार रविशेठ पाटील यांचे आवाहन

**पेण : प्रतिनिधी**

बऱ्याच वेळी कोरोना लसीकरणासाठी ऑनलाईन नोंदणी करूनही अनेक नागरिक लसीकरणापासून वंचित राहत आहेत, हे लक्षात घेऊन पेण शहरामध्ये ठिकठिकाणी लसीकरण केंद्र सुरू करण्यात आली आहेत. तेथे जावून नागरिकांनी कोविड प्रतिबंधक लस घेऊन आपले आरोग्य जपावे, असे आवाहन आमदार रविशेठ पाटील यांनी केले.

आमदार रविशेठ पाटील यांच्या पुढाकरने पेण शहरातील नगरपालिका नाका, लक्ष्मी नारायण मंदिर (रामवाडी), चावडी नाका गणपती मंदिर आणि अंबिका माता मंदिर या ठिकाणी लसीकरण केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. या सर्व लसीकरण केंद्रांवर एक हजार नागरिकांसाठी लस उपलब्ध करून देण्यात आली आहे. या केंद्रांच्या उद्घाटन सोहळ्यात आमदार पाटील बोलत होते. या लसीकरण मोहिमेचा पेणमधील नागरिकांनी लाभ घ्यावा, असे त्यांनी सांगितले.

पेणच्या नगराध्यक्षा प्रितम पाटील, गटनेते अनिरुद्ध पाटील, सभापती राजेश म्हात्रे, नगरसेवक शेहेनाज मुजावर, अजय क्षीरसागर, अश्विनी शहा, भाजप शहराध्यक्ष हिमांशू कोठारी, विजय गौरी, भरत साळवी, अजित पाटील आदि मान्यवर उपस्थित होते.



(छाया : अनिस मनियार)

# अलिबागमधील सागाव फिडरमध्ये बिघाड; पाच हजार ग्राहक अंधारात

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात मंगळवारी (दि. २१) रात्री मुसळधार पावसासोबत वीजाही चमकत होत्या. अलिबाग तालुक्यातील सागाव फिडरवरील वाडगाव येथील इन्सुलेटरवर वीज पडून रात्री साडेनऊ वाजता वीजपुरवठा खंडित झाला. त्यामुळे पाच हजार ग्राहकांना रात्र अंधारात काढावी लागली. सोळा तासानंतर बुधवारी वीजपुरवठा सुरळीत करण्यास महावितरण कर्मचाऱ्यांना यश आले आहे.

अलिबाग तालुक्यातील सागाव फिडरवर साधारण पाच हजार ग्राहक महावितरणची सेवा घेत आहेत. मंगळवारी मुसळधार पावसामुळे या फिडरचा वीजपुरवठा खंडित झाल्याने ग्राहकांना फटका बसला. महावितरण कर्मचारी भर पावसात मध्यरात्री वीजपुरवठा सुरळीत करण्याचा प्रयत्न करीत होते. राऊतवाडी ते वाडगाव दरम्यान झालेला तांत्रिक बिघाड दुरुस्त करताना मुसळधार पाऊस, अंधार आणि वाढलेले मोठे गवत यामुळे अडचण निर्माण झाली होती. त्यामुळे पुन्हा बुधवार सकाळपासून पावसात महावितरण कर्मचाऱ्यांनी दुरुस्तीचे काम हाती घेतले.

### १६ तासाने वीजपुरवठा सुरळीत

अखेर १६ तासाच्या अथक प्रयत्नानंतर वीजपुरवठा सुरळीत सुरू झाला. वीज पडल्याने हा तांत्रिक बिघाड निर्माण झाल्याचे महावितरणचे कनिष्ठ अभियंता एन. आर. बागडे यांनी सांगितले.

अलिबाग तालुक्यातील सागाव, नेहुली, वाडगाव, तळवली, कार्ले, गोंधळपाडा, खंडाळा या गावांना वीजपुरवठा खंडित झाल्याचा फटका बसला होता. त्यामुळे या गावांना कालची रात्र अंधारातच काढावी लागली. महावितरणचे अलिबाग येथील कार्यकारी अभियंता कुंदन भिसे, सहाय्यक अभियंता इनामदार, एन. आर. बागडे यांच्यासह वीज कर्मचाऱ्यांनी वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी मेहनत घेतली.

# नेरळ तळवडे येथे १४० जणांचे लसीकरण

**कर्जत : बातमीदार**

श्री साई ट्रस्ट–नवी मुंबई आणि जय मल्हार मित्र मंडळ यांचे संयुक्त विद्यमाने आणि प्राथमिक आरोग्य केंद्र नेरळ यांच्या सहकार्याने तळवडे येथील सायली फॉर्महाऊसमध्ये घेण्यात आलेल्या शिबिरात एकुण १४० जणांचे लसीकरण करण्यात आले.

नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या हद्दीतील पिंपळोली आरोग्य उपकेंद्राच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या या शिबिरात कोविशिल्ड लसीचे पहिले व दुसरे डोस देण्यात आले. नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्रचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सागर काटे तसेच आरोग्य कर्मचारी सुभाष चव्हाण आणि आरोग्यसेविका यांनी लसीकरण करून घेतले. श्री साई ट्रस्ट आणि जय मल्हार मित्र मंडळाच्या कार्यकर्त्यांनी हे लसीकरण शिबिर यशस्वी होण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.



(छाया : संतोष पेरणे)

# नाझीया सुबेदार यांची नियुक्ती



**रोहे : प्रतिनिधी**

मुस्लिम सेवा संघ या संघटनेच्या रायगड जिल्हा महिला अध्यक्ष पदावर येथील सामाजिक कार्यकर्त्या नाझीया सुबेदार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेच्या राष्ट्रीय महिला अध्यक्ष सायरा शेख यांनी ही नियुक्ती केली.

मुस्लिम समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतीक विकासासाठी मुस्लिम सेवा संघ कार्य करत आहे. संघटनेच्या माध्यमातून शिक्षण, आरोग्य तसेच रोजगार यासाठी कार्य करणार असल्याचा मनोदय नाझीया सुबेदार यांनी व्यक्त केला.



(छाया : सलीम शेख)

# माणगाव पाणोसेतील विद्यार्थ्यांना मास्क, सॅनिटायझर, खाऊचे वाटप

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील होडगाव येथील कै. कल्याणी शांताराम खाडे यांच्या स्मरणार्थ भालचंद्र खाडे यांनी मंगळवारी (दि. २१) पाणोसे (ता. माणगाव) प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना मास्क, सॅनिटायझर, हॅण्डवॉश व खाऊचे वाटप करण्यात आले.

आविष्कार फाउंडेशनचे जिल्हा कार्याध्यक्ष शंकर शिंदे, शिवम कॉम्प्युटर सेंटरचे भालचंद्र खाडे, मारुती फाउंडेशनचे संस्थापक अजित शेडगे यांच्या हस्ते या वेळी विद्यार्थ्यांना मास्क, सॅनिटायझर, हॅण्डवॉश आणि खाऊचे वाटप करण्यात आले. साळवे ग्रामपंचायत सदस्य भिकू शिर्के, पाणोसे गाव अध्यक्ष बळीराम तांबे, शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष रवि कोळी, सदस्य विठोबा जागडे, मुख्याध्यापिका उर्मिला शिंदे, शिक्षक संजीवन खैरे, विवेकानंद गोडबोले यांच्यासह विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते.

# माथेरानमधील शिबिरात १४५ जणांची नेत्रतपासणी

**माथेरान : प्रतिनिधी**

येथील अश्वपाल संघटनेचे नेते स्व. हेमंत बिरामणे यांच्या स्मृतिदिनानिमित्त हेमंतभाई मित्र परिवार आणि आर. झुनझूनवाला शंकर आय हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने माथेरानमधील बोहरी समाज हॉलमध्ये नुकताच मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात १४५ नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली. त्यात मोतीबिंदू आढळलेल्या १५ नागरिकांना शस्त्रक्रियेसाठी पनवेल येथे पाठवण्यात आले.

भाजपचे शहर अध्यक्ष प्रवीण सकपाळ, धनगर समाज अध्यक्ष राकेश कोकळे यांच्यासह अश्वपाल संघटनेचे पदाधिकारी व बिरामणे कुटुंबिय या वेळी उपस्थिती होते.



(छाया : भूषण सातपुते)

# मुरबाड-कर्जत महामार्गावरील म्हसा येथील पुलाला भेगा

**कर्जत : बातमीदार**

मुरबाड-कर्जत-खोपोली महामार्गावर म्हसा येथे बांधलेल्या नवीन पूलाला काही महिन्यातच भेगा पडल्या आहेत. या पुलाला काही धोका निर्माण झाल्यास हा महामार्ग बंद होऊ शकतो. दरम्यान, पुलाचे काम चांगले झाले असून नवीन पुलाला कोणताही धोका नाही, असा दावा रस्ते विकास महामंडळकडून करण्यात येत आहे.

समृद्धी महामार्गवरील वाहने कसारा-डोळखांब येथून मुरबाड-कर्जत अशी येणार आहेत. त्यामुळे रस्ते विकास महामंडळाने या रस्त्यावरील म्हसा (ता. कर्जत) येथील लहान पुलाच्या जागेवर नवीन पूल बांधला आहे. त्याचे काम सुरू असताना पुलाच्या सर्व भागात भेगा पाडण्यास सुरुवात झाली होती. आरसीसी बांधकाम होताना पाण्याचा वापर केला गेला जात नव्हता. त्याबाबत काही वाहन चालकांनी पुलाचे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांकडे तक्रारी केल्या. त्यावेळी महामंडळाने पांढरा सिमेंट रंग लावून पुलाच्या भिंतींना पडलेल्या भेगा बुजविण्याचा प्रयत्न केला होता. मे २०२१ मध्ये या नवीन पुलाचे काम पूर्ण करण्यात आले. आता या पुलाच्या आरसीसी बांधकामाला भेगा पडण्यास सुरुवात झाली आहे. या पुलाला काही धोका निर्माण झाल्यास येथे पर्यायी रस्ता तेथे उपलब्ध नाही, त्याची भीती वाहनचालक व्यक्त करीत आहेत.





(छाया : संतोष पेरणे)

**मुरबाड-कर्जत-खोपोली या रस्त्यावर बनवले जाणारे नवीन पूल ही आमच्यासारख्या सातत्याने प्रवास करणाऱ्या वाहनचालकांसाठी धोक्याची घंटा आहे. पुलाला पडलेल्या भेगांचे शासनाने स्ट्रक्चरल ऑडिट करावे.**
**-दिनेश भोईर, ग्रामस्थ, पोही**

**म्हसा येथील नवीन पुलाचे काम चांगल्या दर्जाचे झाले आहे. पुलाचे आरसीसी बांधकाम करताना नवीन रेडिमिक्स सिमेंट वापरण्यात आले आहे. त्यात असलेल्या केमिकलमुळे बांधकाम केल्यावर पाण्याची आवश्यकता राहत नाही. तरीदेखील तक्रारी असतील, तर पुलाची पाहणी केली जाईल.**
**-सीमा पाटील, उपअभियंता, राज्य रस्ते विकास महामंडळ**

# एसटीची कंटेनरला धडक

## महाडजवळील अपघातात ११ प्रवासी जखमी

**महाड : प्रतिनिधी**



(छाया : महेश शिंदे)

बुधवारी संध्याकाळी मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील शिंदेकोंड गावाच्या हद्दीत महाडकडे येणाऱ्या एसटीच्या निमाराम बसने बुधवारी (दि. २२) संध्याकाळी एका कंटेनरला मागून धडक दिली. या अपघातात ११ प्रवासी जखमी झाले.

एसटीची निमआराम बस बुधवारी सायंकाळी पोलादपूर येथून महाडला येत होती. महाड तालुक्यातील शिंदेकोंड या गावाच्या हद्दीत या बसने पुढे असलेल्या एका कंटेनरला पाठिमागून धडक दिली. या अपघातात वैशाली सुनील चव्हाण (रा. खेड), अशोक बापू तिवारी (रा. पिंपरी चिंचवड), अनंत बबन झोरे (रा. पुणे), भरत वसंत चव्हाण (रा. खेड), आनंदीबाई रामदास माने (रा. पुणे), नंदिनी समीर शिंदे (रा. मुंबई), सुमन अनंत पवार (रा. भोसरी, पुणे), रामदास पांडुरंग कदम (रा. पुणे), रोशनी राजन घोलप (रा. पुणे), रवींद्र गणपत पिंपळकर (रा. पुणे) आणि विनोद सोनू खांबे (रा. महाड) हे प्रवासी जखमी झाले.

या अपघाताची नोंद महाड औद्योगिक पोलीस ठाण्यात करण्यात आली असून एसटी चालक अरुण जाधव (रा, घाटकोपर, मुंबई) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मुरूडमधील विहूर पूल धोकादायक; सार्वजनिक बांधकाम खात्याचे दुर्लक्ष

**मुरूड : प्रतिनिधी**

अतिवृष्टीमध्ये मुरूड-मुंबई रस्त्यावरील विहूर पुलाजवळ मोठा खड्डा पडला आहे. त्यामुळे या पुलावरून एकेरी वाहतूक सुरु आहे. सततच्या पावसामुळे येथील खड्डा मोठा होत आहे, मात्र त्याकडे सार्वजनिक बांधकाम खात्याचे दुर्लक्ष होत आहे. प्रवासी मात्र येथून जीव मुठीत धरून प्रवास करताना दिसत आहेत.



(छाया : संजय करडे)

मुरूड येथून मुंबईकडे जाणाऱ्या महत्त्वाच्या मार्गावर विहूर गावानजीक पुल आहे. जुलै महिन्यातील अतिवृष्टीमुळे या पुलाच्या संरक्षक भिंतीमधील मातीचा भराव वाहून गेल्याने मोठा खड्डा तयार झाला आहे. त्यावेळी तातडीने पुलाची डागडुगी करून सदरचा भराव पूर्वस्थितीत आणला गेला होता. मात्र ८ सप्टेंबरला झालेल्या अतिवृष्टीत त्याच जागेतील माती वाहून गेल्याने पुर्वीपेक्षा मोठा खड्डा तयार झाला आहे. त्यामुळे विहूर पुलावरून सध्या एकेरी वाहतूक सुरु आहे. या परिसरात मुसळधार पाऊस कोसळत आहे. त्यामुळे हा खड्डा अधिक मोठा होत चालला आहे.

दरम्यान, भाजप जिल्हा अध्यक्ष ॲड. महेश मोहिते यांनी विहूर पुलाचे मजबुतीकरण करण्याची मागणी केली होती. मात्र बांधकाम खाते त्याकडे लक्ष देत नसल्याने पुलाचा धोका वाढत आहे.

**मुरूड परिसरात सतत पाऊस पडत असल्याने रस्त्याची कामे करताना समस्या निर्माण होत आहेत. पावसाने विश्रांती घेताच विहूर पुलानजीक पडलेला खड्डा तातडीने बुजविण्यात येईल.**
**-एस. गणगणे, उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुरूड**

# नांदगाव येथे आज कृषी मेळावा

**मुरूड : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाच्या वतीने शुक्रवारी (दि. २४) सकाळी १० वाजता नांदगाव उसरोली (ता. मुरूड) येथील आगरी समाज हॉलमध्ये जिल्हास्तरीय कृषी मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात उपविभागीय कृषी अधिकारी कैलास वानखेडे, मुरूड तालुका कृषी अधिकारी विश्वजीत अहिरे, अभिजित जगदाळे आदी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती संघाचे अध्यक्ष चंद्रकांत मोकल यांनी दिली.


**पनवेल महानगरपालिका**

**व्दितीय जाहिर ई-निविदा सूचना सन २०२१ -२०२२**

पनवेल महानगरपालिकेस सन २०२१-२२ या वित्तिय वर्षा करिता निविदापत्रकात नमुद केलेले पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग निहाय मुली व महिलांना **चार चाकी वाहन चालविणेकामी (शिकाऊ परवाना सहित), व्यावसायिक** प्रशिक्षण देणेकामी पात्र व इच्छुक प्रशिक्षण संस्था/ नोंदणीकृत पुरवठाधारक व प्रशिक्षित असलेल्या संस्था यांच्या कडून सदर कामी ई-निविदा मागविण्यात येत आहेत. याकामी कोरे निविदा प्रपत्र www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

सही/-
**(तृप्ती सांडभोर)**
अतिरिक्त आयुक्त
पनवेल महानगरपालिका

पमपा/मबाक/३४२१/प्र.क्र.०२/
जा.क्र.७७/२०२१.
दि. २०/०९/२०२१



**पनवेल महानगरपालिका**

**व्दितीय जाहिर ई-निविदा सूचना सन २०२१ -२०२२**

पनवेल महानगरपालिकेस सन २०२१-२२ या वित्तिय वर्षा करिता निविदापत्रकात नमुद केलेले पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग निहाय मुली व महिलांना **ऑटो रिक्षा (तीन चाकी) चालविणेकामी (शिकाऊ परवाना सहित)**, व्यावसायिक प्रशिक्षण देणेकामी पात्र व इच्छुक प्रशिक्षण संस्था/नोंदणीकृत पुरवठाधारक व प्रशिक्षित असलेल्या संस्था यांच्या कडून सदर कामी ई-निविदा मागविण्यात येत आहेत. याकामी कोरे निविदा प्रपत्र www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

सही/-
**(तृप्ती सांडभोर)**
अतिरिक्त आयुक्त
पनवेल महानगरपालिका

पमपा/मबाक/३३२१/प्र.क्र.०२/
जा.क्र.७६/२०२१.
दि. २०/०९/२०२१



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे-करंजाडे, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत श्री. जेम्स् डिसिल्व्हा यांचेकडून खरेदीखताने कायमस्वरुपी खरेदी करण्याचे योजिले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-करंजाडे, ता. पनवेल, जि. रायगड**

| भूमापन क्र. | भूमापन क्र.चा उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| ६२ | अ/१/क/१ | ०-२५-९० पो.ख. ०-१३-६० | १.५२ |

वर नमूद मिळकतीस अनुसरून कुणीही व्यक्ती, संस्था, कंपनी, भागीदारी इत्यादींचा कुठल्याही प्रकारचा दान, गहाण, तारण, खरेदी, बयाणा, कर्ज, पोटगी, अन्न-वस्त्र, निवारा, वहिवाट, बक्षिस इत्यादीद्वारे मालकी अथवा इतर कसलाही हक्कहितसंबंध असल्यास, सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांचे आत आपले हक्क हितसंबंधाच्या स्वरूपासहित प्रथमदर्शनी पुराव्यासह खालील सही करणार यांसकडे खाली नमूद पत्त्यावर आपल्या लेखी हरकती रजिस्टर पोस्टाद्वारे अथवा समक्ष दाखल कराव्यात, सदर २१ दिवसांचे आत कुणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास आमचे अशिल सदर वर नमूद मिळकतीचे खरेदीखत कायदेशिरपणे पूर्ण करतील व त्यानंतर मागावून आलेल्या कसल्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत.

दिनांक - २३/०९/२०२१
ठिकाण - पनवेल

सही/-
**ॲड. शरद जाधव**

**संपर्कासाठी पत्ता-** तळमजला, रॉयल प्राईड बिल्डींग, भूखंड क्र. ११३, मिडल क्लास को. ऑप. हौ. सोसायटी, पनवेल-४१०२०६, ता. पनवेल, जि. रायगड. मो.नं. ९८२०६३७१७५


# रायगड जिल्ह्यात वाहनविक्रीत घट

**अलिबाग : प्रतिनिधी**

करोनाचा प्रादूर्भाव आणि टाळेबंदी याचा फटका रायगडातील वाहन विक्री व्यवसायाला बसला आहे. जिल्ह्यात गेल्या दिड वर्षात वाहन विक्रीत मोठी घट झाली आहे. त्यामुळे वाहन विक्रीतून जमा होणाऱ्या महसुलातही घट झाली आहे.



(संग्रहित छायाचित्र)


रायगड जिल्ह्यात पेण उपप्रादेशिक परिवहन कार्यालया अंतर्गत वाहनांची नोंदणी केली जाते. दरवर्षी साधारणपणे २७ ते २८ हजार नवीन वाहनांची नोंदणी या कार्यालया मार्फत केली जाते. मात्र करोनाचा प्रादुर्भाव आणि त्यामुळे लागू करण्यात आलेले निर्बंध याचा फटका जिल्ह्यातील वाहन खरेदीला बसला असल्याचे दिसून येत आहे. गेल्या दिड वर्षात वाहन विक्रीत मोठी घट झाली आहे.

पेण उपप्रादेशिक परिवहन कार्यालया अंतर्गत रायगड जिल्ह्यात २०१८- २०१९ या वर्षात २७ हजार ३१७ नवीन वाहनांची नोंदणी झाली होती. २०१९-२०२० मध्ये २५ हजार ५१० वाहनांची नोंद करण्यात आली. २०२० मध्ये राज्यात करोनाचा प्रादुर्भाव सुरु झाला, त्यामुळे टाळेबंदी जाहीर झाली. याचा फटका वाहन विक्रीला बसला. त्यामुळे २०२०-२१ मध्ये केवळ १८ हजार १८७ नव्या वाहनांची नोंदणी झाली. २०२१- २०२२ या आर्थिक वर्षातही वाहन विक्रीवर मंदीचे सावट कायम आहे. एप्रिल २१ ते ऑगस्ट २१ या पाच महिन्यात सहा हजार ३९६ वाहनांची नोंद करण्यात आली आहे.

सार्वजनिक वाहतूक व्यवस्था बंद असल्याने शहरी भागातील ग्राहकांचा वाहन खरेदीकडे कल असल्याचे दिसून आले. पनवेल उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात गेल्या दिड वर्षात वाहन विक्री वाढल्याचे दिसून आले होते. मात्र पेणमध्ये वाहन विक्री मोठ्या प्रमाणात घटल्याचे दिसून येत आहे. म्हणजेच ग्रामिण भागात वाहन खरेदीला खीळ बसल्याचे दिसून येत आहे. वाहन विक्री घटल्याने यातून मिळणाऱ्या महसुलातही घट झाली आहे.

**पेण उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात वाहन नोंदणीचा तपशील**

| वर्ष | वाहन नोंदणी |
|---|---|
| २०१८-१९ | २७३१७ |
| २०१९-२० | २५५१० |
| २०२०-२१ | १८१८७ |
| २०२१-२२ | ६३९६ (ऑगस्ट अखेर पर्यंत) |




## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत माझे अशिलाने कायम खरेदीखत/ करारनामा करून प्रस्ताविक मिळकतीचे मालक **१. श्री.भगवान पोशा म्हात्रे २. श्री. अनंता पोशा म्हात्रे** या जमीन मालकांकडुन विकत घेण्याच्या विचारात आहेत. तरी सदर मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे .

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे उमरोली, तालुका पनवेल, जिल्हा रायगड**

| गावाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र-हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|
| उमरोली | ७/३/५ | ०-३०-१० पो.ख. ०-०१-८० **एकूण ०-३१-९०** | ३.१२ |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या जमीन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार-मदार, गहान, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यू. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधीतांनी हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तकार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे हस्तांतरणाचे व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणिवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

दि. २३/९/२०२१

सही/-
**ॲड. श्री. महेंद्र अनंता पाटील**

पत्ता : डी/३/१, किनारा हौ. सोसायटी, बावन बंगला, पनवेल, ता. पनवेल जि. रायगड. ४१०२०६ . मो.नं.८८९८०४४६७८



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस सदर जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येत आहे की, १) श्रीमती रमा प्यारेलाल तिवारी २) डॉ. इंदु मनिष बंन्सल ३) डॉ. रचना तिवारी ४) डॉ. अर्चना वाजीफदार रा. कफ परेड रोड, मुंबई यांनी पनवेल येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात स्पे.मु. नं. ४०२/२००८ हा दावा दाखल केला आहे. दाव्यातील प्रतिवादी गजानन दुगाडे (मयत) व संतोष गजानन दुगाडे राहणार मौजे पोयंजे, ता. पनवेल रायगड यांनी खालील वर्णनाच्या जमिनी वादी यांना विक्री करण्याचा व्यवहार करुन विकी किंमत स्वीकारुन पोचपावती दिली आहे. या अनुषंगाने (सेल परमिशन) विक्री परवानगी वादी क्र. १ यांचे पती व वादी क्र. २ ते ४ त्यांचे वडील मयत डॉ. प्यारेलाल तिवारी यांचे लाभात झालेली आहे. लेखी व्यवहाराने विक्री किंमत स्विकारले नंतर जमिनीचा नजराणा वादी यांनी भरला आहे. असे असतना प्रतिवादी क्र. १ चे वारस व प्रतिवादी क्र. २ सदर जमिनीचे खरेदीखत करुन देणेस टाळाटाळ करित आहेत. सबब वादीने प्रतिवादी विरुध्द स्पेसिफीक परफॉरमन्स व निरंतर ताकीद हुकुम मिळणेचा दावा दाखल केला आहे.

**मौजे पोयंजे, ता. पनवेल रायगड**

| अ.क्र. | गांव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | | १२६ | | ०-१३-४० पोख ०-०१-८० **एकुण ०-१५-२०** | २-५६ |
| २ | | १२७ | | ०-२०-७० पोख ०-००-५० **एकुण ०-२१-५** | १-५६ |
| ३ | | १३० | | ०-२९-४० पोख ०-०३-५० **एकुण ०-३२-९०** | ५-२५ |

आता दि. २०/०९/२०२१ रोजी आमचे अशिलांनी सदर दाव्यासंबंधी लिस् पेंडन्स् ची नोटीस मे. दुय्यम निबंधक, पनवेल ५ यांचे कार्यालयात दस्त क्र. ११५९०/२०२१ कडे नोंदणीकृत केली आहे.

त्यासंबंधी सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध केली असून सदर मिळकतीसंबधी कुणीही कोणत्याही प्रकारे व्यवहार करू नये. दावा मिळकतीमध्ये त्रयस्थ इसमांचा हक्क व हितसंबंध निर्माण करू नये.

सदर मिळकती संबंधी कुणीही कोणत्याही प्रकारे व्यवहार केल्यास त्याची कोणतीही जबाबदारी आमचे अशिलांवर येणार नाही. अगर अशा व्यवहारामुळे आमचे अशिलांचे हक्कांस बाधा निर्माण होणार नाही.

कळावे.

पनवेल
ता. २३/९/२०२१

सही/-
**ॲड. दिपाली उमेश बांद्रे**
पत्ता :प्लॉट नं ९५, शॉप नं.६ इंद्रलोक सोसायटी, एस. व्ही. सी. बॅंकसमोर, पनवेल ४१० २०६, जि. रायगड.


# पेणमध्ये साखरचौथ बाप्पांची धूम

**पेण : प्रतिनिधी**

गणेशोत्सवाची सांगता झाल्यानंतर भाद्रपद कृष्ण पक्षात येणाऱ्या संकष्टी चतुर्थीला साखरचौथ गणरायांचे आगमन होते. हौसेचे व नवसाचे गणपती म्हणून साखरचौथ गणेशोत्सव गेल्या दशकभरात लोकप्रिय झाला आहे. या गणपतीला खोबरं आणि साखरेचे सारण असलेल्या मोदकांचा नैवद्य दाखवितात, म्हणून त्याला साखरचौथीचा गणपती म्हणतात.



पेणमधील जवळपास ६० ते ७० टक्के युवक गणपती कारखान्यात व्यस्त असतात. त्यांना गणेशोत्सवामध्ये सहभागी होता येत नाही. त्यामुळे पेणसह उरण, पनवेल, खालापुर तसेच रायगड जिल्ह्यातील इतर ठिकाणी साखरचौथ गणपती बसविण्याची प्रथा तयार झाली आहे. या गणेशोत्सवातही विविध कार्यक्रमांची रेलचेल असते भजन, कीर्तन, प्रवचन, मनोरनाचे कार्यक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम, विविध स्पर्धा होत असतात.

आज (दि. २४) संकष्टी चतुर्थीला या गणपतीचे आगमन होणार असून, त्या निमित्ताने पुन्हा एकदा गणपती बाप्पा मोरयाचा गजर गावागावात घुमणार आहे. रायगड जिल्ह्यासह पेण तालुक्यात ठिकठिकाणी हा उत्सव मोठ्या भक्तीभावाने व उत्साहात साजरा करण्यात येतो. यामध्ये सार्वजनिक तसेच खासगी गणपतीचादेखील समावेश असतो. पेणमध्ये ५१ सार्वजनिक आणि ७० घरगुती गणपती मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे.

पेण शहरात अष्टविनायक मित्र मंडळ, ओरिजिनल अष्टविनायक मित्र मंडळ, गुरव आळीचा राजा, रामवाडीचा राज, प्रेम नगर मित्र मंडळ, श्री दत्त मंडळ, अमरज्योत मित्र मंडळ, श्री मित्र मंडळ, विठ्ठल आळी यांच्यासह ग्रामीण भागात साखरचौथ गणेशोत्सव साजरा करण्यात येतो. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर हा उत्सव शासनाच्या सर्व नियमांचे पालन करून साजरा करण्यात येणार असल्याचे अनेक सार्वजनिक मंडळाच्या सभासदांनी सांगितले.


**सिडको**
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

**सिडको उद्यान विभाग**

शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित (सिडको लि.), नैना प्रकल्पाच्या हद्दीतील खालील नमूद केल्याप्रमाणे भूखंडाच्या विकास कामात बाधित होणारी झाडे तोडण्यास रीतसर परवानगी मागितली आहे.

| अ.क्र. | झाडे तोडावयाचे ठिकाण | अर्जदाराचे नाव | बाधित होणारी झाडे |
|---|---|---|---|
| १. | प्रस्तावित एकात्मिक नगर वसाहत, मौजे वारडोली, ता. पनवेल, जि. रायगड येथील भूखंड क्र. RZ-०४ मधील प्रस्तावित ०९ मी., १२ मी. व १५ मी. रुंद रस्ता | मे. वाधवा कन्स्ट्रक्शन ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. पत्ता : ३०१, प्लॅटिना, भूखंड क्र. सी-५९, जी ब्लॉक, बी.के.सी., बांद्रा(पूर्व) मुंबई - ४०० ०९८. | ३३ |
| | | **एकूण** | **३३** |

सदर भूखंड विकास कामात बाधित होणारी झाडे तोडण्यास परवानगी देणे अगोदर महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे कलम ८ (३) अन्वये हरकती मागविण्यात येत आहेत. तरी कोणाच्या काही हरकती असल्यास ७ दिवसांच्या आत उद्यान विभाग, सिडको लि., ८ वा मजला, रायगड भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई येथे लेखी स्वरुपात देण्यात याव्यात. मुदतीत हरकत न आल्यास झाडे तोडण्यास वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

सही/-
**वृक्ष अधिकारी, सिडको लि.**
सिडको/जनसंपर्क/२३४/२०२१-२२

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**

# दिल्लीची हैद्राबादवर दणदणीत मात

**दुबई : वृत्तसंस्था**

दिल्ली कॅपिटल्सने आपल्या पहिल्याच सामन्यात सनरायझर्स संघावर आठ गडी राखून दणदणीत विजय साकारला. हैदराबादने दिल्लीपुढे विजयासाठी १३५ धावांचे आव्हान ठेवले होते. दिल्लीच्या शिखर धवन आणि श्रेयस अय्यर यांनी दमदार फलंदाजी करत संघाला आठ गडी राखून विजय मिळवून दिला. श्रेयस अय्यरने या वेळी षटकार खेचत संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

हैदराबादच्या १३५ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना दिल्लीची सुरुवात चांगली झाली नाही. कारण दिल्लीला पृथ्वी शॉ याच्या रूपात पहिला धक्का बसला, पण त्यानंतर सलामीवीर शिखर धवन आणि श्रेयस अय्यर यांनी दिल्लीचा डाव सावरला. धवन आणि श्रेयस यांनी दुसऱ्या विकेटसाठी ६७ धावांची भागीदारी रचली. धवनने या वेळी ४२ धावांची खेळी साकारली, तर श्रेयसने दोन चौकार आणि दोन षटकारांच्या जोरावर नाबाद ४७ धावांची खेळी साकारली, दिल्लीचा कर्णधार रिषभ पंतने या वेळी नाबाद ३५ धावा करत श्रेयसला चांगली साथ दिली.



हैदराबादचा धडाकेबाज सलामीवीर डेव्हिड वॉर्नर हा तिसऱ्याच चेंडूवर बाद झाल्याचे पाहायला मिळाले, वॉर्नरला या वेळी भोपळाही फोडता आला नाही. पहिल्याच षटकात धक्का बसल्यावर वृद्धिमान साहा आणि कर्णधार केन विल्यम्सन यांनी सावध सुरुवात केली, पण या जोडीला मोठी धावसंख्या उभारता आली नाही. दिल्लीचा वेगवान गोलंदाज कागिसो रबाडाने साहाला बाद केले आणि ही जोडी फोडली. साहाला या वेळी १८ धावांवर समाधान मानावे लागले. साहा बाद झाल्यावर संघाची जबाबदारी ही कर्णधार केनवर होती. केन या वेळी सावधपणे धावा वाढवण्याचा प्रयत्न करत होता, पण फिरकीपटू अक्षर पटेलने या वेळी केनला बाद केले आणि हैदराबादला मोठा धक्का दिला. केनला या वेळी १८ धावा करता आल्या. केन बाद झाला आणि हैदराबादचा डाव अडचणीत आल्याचे पाहायला मिळाले. त्यानंतर अब्दुल समदने काही काळ धडाकेबाज फलंदाजी करत २८ धावा फटकावल्या आणि संघाला शतकाची वेस ओलांडून दिली. त्याचबरोबर रशिद खाननेही अखेरच्या षटकात चांगली फलंदाजी केल्याचे पाहायला मिळाले. त्यामुळेच हैदराबादच्या संघाला १३४ धावा करता आल्या.

# रायगड प्रीमिअर लिगसाठी खेळाडूंवर बोली

**कर्जत : बातमीदार**

रायगड जिल्ह्यात नोव्हेंबर महिन्यात होणाऱ्या २५ वर्षा खालील खेळाडूंसाठी २०-२० क्रिकेट स्पर्धेचे आयोजन रायगड प्रीमिअर लिग कमिटीमार्फत करण्यात आले आहे. या स्पर्धेत खेळणाऱ्या खेळाडूंचा नुकताच बोली पद्धतीने लिलाव (ऑक्शन) झाला. रायगड जिल्ह्यातील खेळाडूंचा लिलाव पनवेल तालुक्यातील मानघर येथील छाया रिसॉर्टमध्ये करण्यात आला. एकूण आठ संघांमध्ये ही स्पर्धा होणार असून रायगड जिल्ह्यातील सुमारे चारशे खेळाडूंनी या स्पर्धेत ऑनलाइन पद्धतीने फॉर्म भरून आपला सहभाग नोंदवला आहे. या खेळाडूंना ऑक्शन पद्धतीने आठ संघांचे संघ मालकांनी आभासी पॉईंट्स प्रकाराने आपापल्या संघात दाखल करून घेतले आहे.



प्रत्येक संघात १५ खेळाडूंचे ऑक्शनद्वारे पथक तयार करण्यात आले. दरम्यान, ज्या खेळाडूंचे लिलाव (ऑक्शन) झालेले नाही अशा सर्व खेळाडूंना स्पर्धेत सहभागी करून घेण्यासाठी आयोजकांनी अशा राखीव खेळाडूंसाठी सामन्याचे नियोजन केले आहे. या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या १६ खेळाडूंना स्पर्धेच्या धर्तीवर आठ संघांमध्ये स्थान देण्यात येईल.

या वेळी सिडकोच्या एम्प्लॉइज युनियनचे अध्यक्ष निलेश तांडेल, प्रभाकर घरत, ओएनजीसीचे उपमहाव्यवस्थापक, सिडको युनियनचे उपाध्यक्ष विनोद पाटील, सचिव जे. टी. पाटील, जिल्हा परिषद सदस्य रवी पाटील, सुप्रसिद्ध उद्योजक मार्फी क्रीयाडो, लायन्स क्लब खोपोलीचे अध्यक्ष महेश राठी, रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे कार्याध्यक्ष प्रदीप नाईक, तसेच विजय खानावकर, अ‍ॅड. विक्रांत घरत, रायगड प्रीमिअर लिगचे अध्यक्ष राजेश पाटील, सचिव जयंत नाईक, उपाध्यक्ष आनंद घरत, डॉ. राजाराम हुलवान, खजिनदार कौस्तुभ जोशी, प्रदीप खलाटे, सुबोध दरणे, जितेंद्र नाईक, अ‍ॅड. पंकज पंडित, शंकर दळवी, संदीप जोशी, अमोल येरुणकर आदींसह रायगड जिल्ह्यातील खेळाडू आणि क्रिकेटप्रेमी उपस्थित होते.

## क्रिकेटच्या नियमात बदल; यापुढे बॅट्समनला बॅटर म्हणणार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

क्रिकेटच्या नियमात बदल करण्याचे अधिकार मॅरिलबोन क्रिकेट क्लब (एमसीसी)ला आहेत. या क्लबने बुधवारी एक मोठी घोषणा केली आहे. यापुढे पुरुष आणि महिला क्रिकेटमध्ये फलंदाजाला बॅट्समॅनच्या ऐवजी बॅटर अशा शब्द वापरला जाईल. याची अंमलबजावणी तातडीने होणार आहे. एमसीसीच्या समितीने या नियमातील बदलाला मंजुरी दिली आहे.

क्रिकेटच्या नियमांचे संरक्षण आणि त्याचा विकास करणाऱ्या एमसीसीच्या मते जेंडर न्यूट्रल शब्दावलीचा वापर सर्वांसाठी एकच असला पाहिजे. यामुळे क्रिकेटचा दर्जा सुधारण्यास मदत होईल. महिला आणि पुरुषांच्या क्रिकेटमध्ये फलंदाजाला बॅट्समॅन असे म्हटले जाते.

महिला क्रिकेटने जगभरात अभूतपूर्व विकास केला आहे. यामुळेच महिला आणि मुलींना क्रिकेट खेळण्यासाठी अधिक प्रोत्साहित करण्यासाठी जास्तीत जास्त जेंडर न्यूट्रल शब्दांचा वापर करण्याचा विचार सुरू होता. अनेक संस्था आणि माध्यमांनी बॅटर हा शब्द वापरण्यास सुरुवात केली आहे.

## लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून दीपक हुडाची चौकशी

**दुबई : वृत्तसंस्था**

लाचलुचपत प्रतिबंधक नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी पंजाब किंग्ज संघाचा अष्टपैलू दीपक हुडाची चौकशी होणार आहे. मंगळवारी पंजाब आणि राजस्थान रॉयल्स यांच्यातील सामन्यापूर्वी काही तास हुडाने पंजाब संघाचा लोगो असलेले हेल्मेट घालतानाचे छायाचित्र ‘ट्वीट’ केले.

‘भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचा (बीसीसीआय) लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (एसीयू) हुडाच्या या छायाचित्राची चौकशी करणार आहे. कोणत्याही सामन्यापूर्वी संघाच्या रचनेबद्दल माहिती देण्यावर बंदी आहे,’ असे ‘एसीयू’च्या एका अधिकाऱ्याने सांगितले. हुडाने ‘ट्वीट’मध्ये पुन्हा स्पर्धेसाठी सज्ज असल्याचे म्हटले. त्यामुळे तो राजस्थानविरुद्ध खेळणार असल्याचे सामन्यापूर्वीच समजले. ‘आयपीएल’ खेळाडूंच्या हालचाली आणि त्यांच्या समाजमाध्यमांवरील पोस्टवरही लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची नजर आहे.

## क्रिकेट दौरे रद्द झाल्याने इम्रान खान खवळले

**इस्लामाबाद : वृत्तसंस्था**

न्यूझीलंड आणि इंग्लंडने पाकिस्तान दौरा रद्द केल्याने पाकिस्तानचे पंतप्रधान इम्रान खान स्तब्ध झाले आहेत. न्यूझीलंड आणि इंग्लंड संघाने दौरा रद्द केल्याने संपूर्ण जगात पाकिस्तानची नाचक्की झाली आहे. त्यामुळे इम्रान खान यांनी पाकिस्तान क्रिकेट संघाला आगामी टी -२० विश्वचषकात भारताविरुद्ध निर्भयपणे वाघासारखे खेळण्याचा सल्ला दिला आहे. दौरा रद्द केल्यामुळे इम्रान खान यांनी स्वत: न्यूझीलंडच्या पंतप्रधानांना फोन करून सुरक्षेचे आश्वासन दिले होते, पण जॅसिंडा अर्डर्न यांनीही पाकिस्तानी पंतप्रधानांकडे दुर्लक्ष केले. यानंतर इम्रान खान पाकिस्तानी संघाची भेट घेत अपमानाचा बदला घ्या, असे आवाहन केले आहे. ‘आपने घबराना नहीं’ असे म्हणत त्यांनी खेळाडूंना आधार दिला.



एक्सप्रेसने दिलेल्या वृत्तानुसार, इम्रान खान यांनी पाकिस्तानी खेळाडूंना टी-२० विश्वचषकात चांगले खेळून न्यूझीलंड आणि इंग्लंड दौरा रद्द केल्याचा बदला घेण्यास सांगितले. दरम्यान, न्यूझीलंड आणि इंग्लंडने दौरे रद्द केल्यामुळे पाकिस्तानी खेळाडूंचा आत्मविश्वास कमी झाला आहे. त्यामुळे इम्रान खान यांनी संघाला भेटून त्यांना प्रोत्साहित करण्याचा प्रयत्न केला आहे. या बैठकीनंतर पाकिस्तानी सिनेटर फैसल जावेद म्हणाले की, पंतप्रधानांनी खेळाडूंना भारताविरुद्ध निर्भयपणे क्रिकेट खेळण्यास सांगितले.




## राम प्रहर दिवाळी अंकासाठी आवाहन

दरवर्षी दिवाळी अंकात नावीन्यपूर्ण विषय हाताळून वाचकांना वैचारिक फराळाची मेजवानी देणाऱ्या दै. राम प्रहरने यंदा समाजातील लक्षणीय बदलांवर ‘स्थित्यंतर’ हा दिवाळी अंक प्रसिद्ध करण्याचे योजिले आहे. या अंकात आरोग्य, शिक्षण, धर्मकार्य, गाव, शहर, समाज, बाजारपेठ, कोरोना काळ, डॉक्टरी, वकिली व पत्रकारिता पेशा यासह (राजकारण वगळता) इतर क्षेत्रातील बदलांचा समावेश असणार आहे. आपल्या निरीक्षणातून टिपलेल्या बदलांबाबत अभ्यासपूर्ण लेख अपेक्षित आहे. त्याचबरोबर नेहमीप्रमाणे कथा, कविता, चारोळ्या, व्यंगचित्र आदी साहित्यही असणार आहे. आपला मजकूर मंगळवार, ५ ऑक्टोबर २०२१पर्यंत ramprahar@gmail.com या मेलवर टाईप करून पाठवावा. साहित्य निवडण्याचे अधिकार संपादकीय मंडळाला असतील. अधिक माहितीसाठी ७७३८१०६००९ या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधावा.

**–मुख्य संपादक**













दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com